SHIV VANI

# शिव वाणी

सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी

का.संपादक : वेदांत वैभव स्वामी
संपादक : वैभव विवेक स्वामी



beedshivvani@gmail.com
Mo.9422748792/ 9822628521



शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777



बीड | साप्ताहिक | मराठी | वर्ष २४ वे | अंक-२० | सोमवार, दि.१८ मे २०२६ | RNI-MAHMAR2003/14666 | किंमत: ३ रू. | पाने : ४

Beed (Maharashtra) | Weekly | MARATHI | Year-24 | Issue-20 | Monday, Dt.18 May 2026 | RNI-MAHMAR2003/14666 | Rupees-3 Rs | PAGES-4


# उष्णतेचा कहर महाराष्ट्रात सनस्ट्रोकचे बळी वाढतच आहेत..!

## महाराष्ट्रात सनस्ट्रोकची १७५ प्रकरणे यापैकी ६ जणांचा मृत्यू..!



### मृत्यूंची संख्या लपवली जातेय का. ?

महाराष्ट्र आरोग्य यंत्रणा राज्यामध्ये सन स्ट्रोक झालेल्या रुग्णांची संख्या फक्त १७५ सांगत असून यापैकी ६ जणांचे मृत्यू झालेले आहेत. यापैकी सन स्ट्रोक झाल्यामुळे केवळ २ मृत्यू झाल्याची सरकारी नोंद आहे. वास्तविक सन स्ट्रोक झालेल्या रुग्णांची संख्या हजारोच्या घरात गेली असून मृत्यू पावलेल्या रुग्णांची संख्या शेकडोच्या घरात गेलेली आहे. मग शासन ही आकडेवारी कशामुळे लपवत आहे ? असा प्रश्न निर्माण होत आहे.वास्तविक सरकारने वस्तुनिष्ठ माहिती जनतेसमोर देणे गरजेचे आहे.

### सरकारचे फक्त आदेशमदत कुठे आहे ?

नैसर्गिक आपत्तीने मृत्यू झाल्यास सरकार त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देऊन वेळप्रसंगी शासकीय सेवेत संधी देऊन त्या कुटुंबाला आधार देते.सन स्ट्रोकने मृत्यू पावणे हा देखील नैसर्गिक आपत्तीचा भाग आहे .असे असताना सुद्धा महाराष्ट्रात ज्यांचा सनस्ट्रोकमुळे नाहक मृत्यू झाला त्यांच्या पाठीशी सरकार उभारल्याचे चित्र आत्तापर्यंत कुठे दिसून आलेले नाही. ही बाब निश्चितच निंदनीय असून निषेधार्य आहे. सरकारने नैसर्गिक आपत्ती अंतर्गतच सन स्ट्रोक झाल्यामुळे ज्यांचा मृत्यू झाला आहे त्या कुटुंबियांना आर्थिक मदतीसह त्या कुटुंबियांना सक्षम आधार मिळेल या संदर्भात संवेदनशील होऊन पाठबळ देणे गरजेचे आहे.

**बीड | प्रतिनिधी**

**महाराष्ट्रात यंदाच्या उन्हाळ्याने अक्षरशः कहर केला असून राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये तापमानाने ४० अंशांचा टप्पा पार केला आहे. विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक भाग उष्णतेच्या झळांनी होरपळत असताना सनस्ट्रोकमुळे मृत्यूंची मालिका सुरू झाली आहे. मात्र या गंभीर संकटाकडे प्रशासन अजूनही आकडेवारीचा खेळ म्हणून पाहत आहे का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.**

राज्य आरोग्य विभागाच्या ताज्या आकडेवारीनुसार मार्च ते मे २०२६ दरम्यान महाराष्ट्रात सनस्ट्रोकची १७५ प्रकरणे नोंदवली गेली असून किमान ६ जणांचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. यामध्ये दोन मृत्यू अधिकृतरीत्या निश्चित तर चार मृत्यू संशयित स्वरूपात दाखवण्यात आले आहेत. मात्र आरोग्य तज्ज्ञांच्या मते प्रत्यक्ष मृतांचा आकडा यापेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. जळगाव जिल्ह्यातील पाचोरा येथे फळविक्रेता आनंद भोई यांचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची अधिकृत पुष्टी झाली. ४३ अंश तापमानात दिवसभर उन्हात काम करताना ते कोसळले. तर लातूरमध्ये शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्याच्या मृत्यूची चौकशी सनस्ट्रोक म्हणून सुरू आहे. धक्कादायक बाब म्हणजे सरकारकडे उष्माघात रोखण्यासाठी मोठमोठ्या सूचना आहेत, पण प्रत्यक्ष जमिनीवर उपाययोजना अपुऱ्या दिसत आहेत. दुपारी बाहेर पडू नका, पाणी प्या, डोक्यावर टोपी वापरा अशा सूचना देऊन प्रशासन आपली जबाबदारी संपल्यासारखे वागत असल्याची भावना नागरिकांत आहे. ग्रामीण भागात अद्यापही अनेक प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये थंडगार कक्ष, तातडीची उपचार व्यवस्था किंवा प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती आहे. सर्वात गंभीर प्रश्न म्हणजे मृतांच्या

◀◀ पान २ वर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या अर्ध्यावर

**मुंबई | प्रतिनिधी**

**इंधन आणि परकीय चलन बचतीच्या अनुषंगाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज २ उच्चस्तरीय बैठकीत विविध उपाययोजनांचा आढावा घेतला आणि त्यानुसार काही निर्णय जाहीर केले.**

बैठकीत घेण्यात आलेले प्रमुख निर्णयामध्ये प्रामुख्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व मंत्र्यांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या ही तात्काळ प्रभावाने अर्ध्यावर आणण्यात यावी. बाहेरच्या प्रवासात असताना ताफ्यातील वाहनांची संख्या निर्धारित संख्येपेक्षा अधिक नसेल याची जबाबदारी संबंधित पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षक यांची असेल. मंत्री-अधिकारी यांनी कोणतेही विदेश दौरे करु नयेत. मंत्र्यांनी अत्यावश्यक नसेल तेव्हा शासकीय विमान, हेलिकॉप्टर यांचा वापर करु नये, त्याऐवजी नियमित विमानसेवेचा वापर करावा. मंत्री-अधिकाऱ्यांनी आवर्जून मेट्रो आदी सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढवावा. पहिल्या टप्प्यात किमान एक दिवस असा प्रयोग करावा. अधिकाऱ्यांना बैठकांना बोलावण्याऐवजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून बैठका घ्याव्यात. शासनात वितरित करण्यात आलेल्या वाहनांचा काटेकोरपणे आढावा घेण्यात यावा. ऊर्जा बचतीसाठी अनावश्यक होर्डिंग्ज/फ्लेक्सवरील कारवाया वाढवण्यात याव्यात आणि तेथे डेकोरेटिव्ह लायटिंगचा वापर होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी. यावेळी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेतील गुणवंताचा सत्कार

### गुणवंत विद्यार्थ्यांनी सत्कारासाठी नोंदणी करावी-जगद्विवेक प्रतिष्ठान

**बीड | प्रतिनिधी**

**वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी ६० टक्के पेक्षा अधिक गुण घेतले आहेत अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख रकमेसह मान्यवरांच्या शुभहस्ते गुरुवार दिनांक २५ जून २०२६ रोजी जाहीर नागरिक सत्कार करण्यात येणार आहे.या सत्कारास पात्र असलेल्या वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांनी तात्काळ नोंदणी करावी असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.**

मागील १४ वर्षापासून जगद्विवेक प्रतिष्ठान बीडच्या वतीने वीरशैव लिंगायत समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा नागरी सत्कार दरवर्षी २५ जून रोजी करण्यात येतो. यावर्षी देखील गुरुवार दिनांक २५ जून २०२६ रोजी मान्यवरांच्या शुभहस्ते इयत्ता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेमध्ये ज्या विद्यार्थ्यांनी ६०% पेक्षा अधिक गुण घेतले आहेत असे विद्यार्थी. त्याचबरोबर ज्या विद्यार्थ्यांनी जेई, सीईटी, नीट परीक्षेमध्ये पात्र ठरले असतील किंवा स्कॉलरशिप परीक्षेमध्ये, नवोदय परीक्षेमध्ये पात्र ठरलेले असतील अशा विद्यार्थ्यांनी देखील ९४ २२ ७४ ४६ ०५ आणि ९९ ६० ४६ ३२ ४४ या दोन्ही व्हाट्सअप नंबर वर मार्क्स मेमो, आपला पासपोर्ट फोटो, तसेच आपले पूर्ण नाव, गाव, तालुका, जिल्हा असे टाईप करून पाठवावे. नोंदणी झालेल्या विद्यार्थ्यांमधून प्रथम, द्वितीय, तृतीय आणि उत्तेजनार्थ विद्यार्थ्यांची निवड टक्केवारीनुसार केली जाईल. आणि या विद्यार्थ्यांना रोख रकमेसह सन्मानपत्र देऊन गौरविण्यात येईल. त्याचबरोबर ६०% पेक्षा अधिक मार्क्स घेऊन उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे. या सत्कारास पात्र ठरत असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांनी वरील नंबर वर

◀◀ पान २ वर

## दहावी, बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा पत्रकार संघाच्या वतीने सत्कार

### पत्रकारांच्या गुणवंत पाल्यांनी तात्काळ संपर्क साधावा-वैभव स्वामी

**बीड | प्रतिनिधी**

**इयत्ता दहावी आणि बारावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये पत्रकारांच्या ज्या विद्यार्थ्याने ६० टक्के पेक्षा अधिक गुण घेतले आहेत त्या विद्यार्थ्यांचा पत्रकार संघाच्या वतीने जाहीर सत्कार मान्यवरांच्या शुभहस्ते करण्यात येणार आहे.अशा गुणवंत विद्यार्थ्यांनी वॉट्स अप नंबर ७० ३० १४ ९३ २२ या नंबर वर आपले मार्क्स मेमो आणि पासपोर्ट फोटो पाठवून नोंदणी करावी असे आवाहन पत्रकार संघाच्या वतीने प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केले आहे.**

बीड जिल्ह्यातील वृत्तपत्र क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या पत्रकार बांधवांसह इतर सर्व विभागातील ज्यांची मुले इयत्ता दहावी आणि बारावी परीक्षेमध्ये ६० टक्के पेक्षा अधिक गुण घेऊन उत्तीर्ण झालेले आहे अशा गुणवंत विद्यार्थ्यांना लवकरच मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. या सन्मानास पात्र असलेल्या पत्रकारांच्या मुलां मुलींनी ७० ३० १४ ९३ २२ या व्हाट्सअप नंबर वर आपला मार्क्स मेमो तसेच पासपोर्ट फोटो आणि पूर्ण नाव आपल्या पालकाचे नाव आणि ते ज्या वृत्तपत्रात काम करतात त्याचे नाव हे टाईप करून पाठवावे आणि नोंदणी करावी असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यासह बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान, महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष



◀◀ पान २ वर

## लातूर जिल्ह्यातील शासकीय निवासी शाळांमध्ये २० मे पर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरू

**लातूर | प्रतिनिधी**

**महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत लातूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौद्ध मुला-मुलींच्या सहा शासकीय निवासी शाळांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. तरी गरजू विद्यार्थ्यांना या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.**

जिल्ह्यामध्ये लातूर एमआयडीसी, लामजना (ता. औसा), तोंडारपाटी (ता. उदगीर) आणि मरशिवणी (ता. अहमदपूर) येथे मुलांच्या शाळा, तर जाऊ (ता. निलंगा) आणि बावची (ता. रेणापूर) येथे मुलींच्या निवासी शाळा कार्यरत आहेत. या शाळांमध्ये इयत्ता सहावीच्या वर्गासाठी मुख्यत्वे प्रवेश दिले जाणार असून, सातवी ते दहावीच्या वर्गांमधील रिक्त जागांवरही प्रवर्गानुसार प्रवेश प्रक्रिया राबवण्यात येणार आहे. प्रवेशासाठी शासनाचे आरक्षणाचे नियम लागू असून, त्यात अनुसूचित जातीसाठी ८० टक्के, अनुसूचित जमाती १० टक्के, विमुक्त भटक्या जमाती ३ टक्के, विशेष मागास प्रवर्ग २ टक्के आणि दिव्यांग प्रवर्गासाठी ५ टक्के जागा राखीव आहेत. प्रत्येक वर्गाची प्रवेश क्षमता ४० विद्यार्थी इतकी असून, इच्छुकांनी २० मे २०२६ पर्यंत संबंधित

◀◀ पान २ वर

## बीड जिल्ह्यास थलेटिक्स व टेबल टेनिस या दोन खेळांचे अनिवासी जिल्हास्तर क्रीडा प्रतिभा केंद्र सुरु करण्यास मान्यता

**बीड | प्रतिनिधी**

**राज्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासाकरिता मिशन लक्षवेध हा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आलेला असुन, या योजनेंतर्गत बीड जिल्ह्यास थलेटिक्स व टेबल टेनिस या दोन खेळांचे अनिवासी जिल्हास्तर क्रीडा प्रतिभा केंद्र सुरु करण्यास मान्यता मिळालेली आहे.**

या जिल्हास्तर क्रीडा प्रतिभा केंद्राअंतर्गत थलेटिक्स व टेबल टेनिस या दोन खेळांच्या प्रत्येकी २० खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. याकरिता खालील निकषानुयार पात्र खेळाडुनी आपले अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा क्रीडा संकुल परिसर, जालना रोड, बीड येथे प्रत्यक्ष अथवा dsobeed2442gmail.com या ई-मेल वर दिनांक १८ मे, २०२६ पर्यंत करावेत. मिशन लक्ष्यवेध या योजनेअंतर्गत प्रवेशासाठी जास्तीत जास्त खेळाडूंनी अर्ज करावा व अधिक माहितीसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा कीडा संकुल परिसर, जालना रोड बीड येथे कार्यालयीन वेळत श्री. रेवननाथ शेलार ( मो. न. ९०७५४७६७९१ ) श्री. अविनाश पाटील ( मो. नं . ९६२३७८११२१ ) यांना संपर्क साधावा असे आवाहन श्री अरविंद विद्यागर जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड यांनी केले आहे.

### ●नगरपालिकेच्या दुटप्पीपणा निषेधार्ह-डॉ.गणेश ढवळे

## धनदांडग्यांना, पुढाऱ्यांना पायघड्या मात्र गोरगरिबाना कायद्याचा दंडुका !

**बीड | प्रतिनिधी**

**बीड शहरातील बसस्थानक, जिल्हा रुग्णालय परिसरातील रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या टपऱ्या, फेरीवाले व लघुउद्योजकांच्या दुकानांवर अतिक्रमण हटाव मोहिमेच्या नावाखाली कारवाई करत नगरपालिकेने कायद्याचा धाक दाखवला. मात्र दुसरीकडे शहरातील मोठमोठ्या अतिक्रमणांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.**





नगरपालिकेने गोरगरीबांच्या उपजीविकेवर हातोडा चालवत स्वतःची पाठ थोपटून घेतली असली, तरी बिंदुसरा व करपरा नदीपात्रातील अतिक्रमित बांधकामे, मोठमोठे मंगल कार्यालये, हॉटेल्स आणि भू-माफियांनी केलेल्या नियमबाह्य बांधकामांवर मात्र कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

◀◀ पान २ वर

## केंद्र सरकारचे मोठे निर्णय....

**मागील आठवड्यात केंद्र सरकारने शिक्षण, संरक्षण, डिजिटल सुरक्षा, पायाभूत सुविधा, कृषी आणि रोजगार क्षेत्राशी संबंधित अनेक महत्वाचे निर्णय घेतले. काही निर्णयांना जनतेकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला, तर काहींवरून विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली. देशाच्या प्रशासनिक आणि आर्थिक धोरणांवर दूरगामी परिणाम करणाऱ्या या प्रमुख निर्णयांचा थोडक्यात आढावा....**

### देशभरात सायबर गुन्ह्यांविरोधात मोठी मोहीम..!

दिल्ली - फेक लोन ॲप आणि ऑनलाइन आर्थिक फसवणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने गृह मंत्रालय, ठइख, दूरसंचार विभाग आणि सायबर सेल यांची संयुक्त यंत्रणा अधिक मजबूत करण्याचा निर्णय घेतला. संशयित मोबाईल नंबर आणि बँक खात्यांवर तात्काळ कारवाईसाठी विशेष 'रिअल टाइम मॉनिटरिंग सिस्टम' सुरू करण्यात आली आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाने सर्व राज्यांना सायबर गुन्ह्यांवर जलद एफआयआर आणि तत्काळ आर्थिक ब्लॉकिंगसाठी सूचना जारी केल्या आहेत.

### नीट आणि स्पर्धा परीक्षांवर केंद्राचा मोठा निर्णय..!

दिल्ली -नीट आणि इतर राष्ट्रीय परीक्षांमध्ये झालेल्या गैरप्रकारांनंतर केंद्र सरकारने राष्ट्रीय परीक्षा व्यवस्थेत मोठे बदल जाहीर केले. प्रश्नपत्रिका वितरण, उमेदवार पडताळणी आणि परीक्षा केंद्रांवर कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) आधारित देखरेख लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने पेपरफुटी रोखण्यासाठी नवीन डिजिटल एन्क्रिप्शन प्रणाली लागू करण्याची तयारी सुरू केली आहे. भविष्यात परीक्षा प्रक्रियेत सहभागी कर्मचाऱ्यांची स्वतंत्र सुरक्षा पडताळणीही बंधनकारक केली जाणार आहे.

### सीमेवरील सुरक्षेसाठी संरक्षण मंत्रालयाचा मोठा निर्णय

दिल्ली - भारत-चीन आणि भारत-पाक सीमा भागातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने संरक्षण क्षेत्रासाठी विशेष निधी मंजूर केला आहे. संरक्षण मंत्रालयाने अत्याधुनिक ड्रोन, अँटी-ड्रोन सिस्टीम आणि -ख आधारित निगराणी तंत्रज्ञान खरेदी प्रक्रियेला गती देण्याचा निर्णय घेतला. सीमाभागातील लष्करी तळांवर डिजिटल सर्व्हेलन्स वाढवण्याचे आदेशही देण्यात आले आहेत.

### रेल्वे प्रवाशांसाठी मोठा दिलासा..!

दिल्ली - रेल्वे मंत्रालयाने देशातील प्रमुख रेल्वे स्थानकांवर सुरक्षा आणि आधुनिक सुविधा वाढवण्यासाठी विशेष योजना जाहीर केली. मुंबई, पुणे, नागपूर, दिल्ली, चेन्नई आणि कोलकाता यांसह १०० स्थानकांवर -ख आधारित सीसीटीव्ही, फेस रिकग्निशन आणि महिला सुरक्षा पथक तैनात करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच अनधिकृत विक्रेते आणि गुन्हेगारी टोळ्यांवर कारवाईसाठी रेल्वे सुरक्षा दलाला विशेष अधिकार देण्यात आले आहेत.

### शेतकऱ्यांसाठी केंद्राची मोठी घोषणा..!

दिल्ली - देशभरात वाढत्या उष्णतेचा आणि पावसाच्या अनिश्चिततेचा विचार करून केंद्र सरकारने खरीप हंगामासाठी खत आणि बियाण्यांवर अतिरिक्त अनुदान जाहीर केले. कृषी मंत्रालयाने राज्यांना तातडीने साठा उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले आहेत. दुष्काळग्रस्त भागांमध्ये पाणीटंचाई लक्षात घेऊन सूक्ष्म सिंचन योजनांनाही वेग देण्याचा निर्णय घेण्यात आला.

### सरकारी भरती प्रक्रियेत पारदर्शकतेवर भर

दिल्ली - केंद्रीय कार्मिक विभागाने सर्व मंत्रालये आणि सरकारी विभागांना भरती प्रक्रिया पूर्णपणे डिजिटल करण्याचे निर्देश दिले. उमेदवारांची पडताळणी, दस्तऐवज तपासणी आणि निकाल प्रक्रिया ऑनलाइन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे भ्रष्टाचार, बनावट प्रमाणपत्रे आणि मध्यस्थांची भूमिका कमी होईल, असा सरकारचा दावा आहे.

### महागाई नियंत्रणासाठी केंद्र सरकार सतर्क

दिल्ली - देशात वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय अर्थ मंत्रालय आणि अन्न पुरवठा विभागाने संयुक्त पुनरावलोकन बैठक घेतली. डाळी, खाद्यतेल आणि इंधनाच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी साठेबाजांविरोधात कारवाईचे आदेश देण्यात आले. आवश्यक वस्तूंच्या पुरवठ्यावर दररोज देखरेख ठेवण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला.

## अग्रलेख....

# नीट घोटाळ्याची.. सावली बीडपर्यंत..!

**शिक्षणाच्या मंदिरात दलालांचा बाजार**
**राज्यकर्ते आणि यंत्रणा अजून किती गप्प राहणार..?**

बीड – देशातील वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेश प्रक्रियेवर विश्वास ठेवणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणारा नीट घोटाळा आता केवळ दिल्ली, बिहार किंवा राजस्थानपुरता मर्यादित राहिलेला नाही. या घोटाळ्याचे धागेदोरे थेट महाराष्ट्रातील बीडपर्यंत पोहोचत असल्याच्या चर्चांनी राज्य हादरले आहे. शिक्षणाच्या पवित्र व्यवस्थेत जर पैशाच्या बळावर गुणवत्ता विकत घेतली जात असेल, तर हा केवळ घोटाळा नसून देशाच्या भावी आरोग्य व्यवस्थेवरचा भीषण आघात आहे.

बीड हे नाव गेल्या काही वर्षांत अनेक गंभीर आणि वादग्रस्त घटनांमुळे राष्ट्रीय चर्चेत आले. कधी पेपरफुटी, कधी टोळ्यांचे साखळी गुन्हे, कधी राजकीय दबाव, तर कधी शिक्षणातील काळेबेरे व्यवहार आणि आता नीट घोटाळ्याच्या संशयित साखळीत बीडचे नाव पुढे येणे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. जर या प्रकरणात खरोखरच स्थानिक एजंट, शिक्षण माफिया किंवा राजकीय छत्रछाया असलेले लोक सहभागी असतील, तर हा महाराष्ट्राच्या शिक्षण व्यवस्थेवरचा काळा डाग ठरेल. सर्वात भयानक बाब म्हणजे गरीब आणि मध्यमवर्गीय विद्यार्थ्यांचा विश्वास उध्वस्त होत आहे. एखादा विद्यार्थी दिवस–रात्र अभ्यास करून गुण मिळवतो, पण दुसरीकडे पैशांच्या जोरावर कोणी मेडिकल सीट मिळवत असेल, तर मग गुणवत्ता, स्पर्धा आणि प्रामाणिक परिश्रम यांचा अर्थ काय उरतो ? लाखो पालकांनी मुलांच्या शिक्षणासाठी घेतलेले कर्ज, विद्यार्थ्यांनी सोसलेला मानसिक ताण आणि आत्महत्येच्या उंबरठ्यावर पोहोचलेली तरुणाई याची जबाबदारी कोण घेणार ? या घोटाळ्याने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, देशात शिक्षणाभोवती एक संघटित दलाल व्यवस्था उभी राहिली आहे. परीक्षा केंद्रांपासून ते कोचिंग लॉबीपर्यंत आणि स्थानिक एजंटपासून ते मोठ्या राजकीय आश्रयदात्यांपर्यंत संपूर्ण साखळी सक्रिय असल्याचा संशय आता उघडपणे व्यक्त होऊ लागला आहे. मेरिट हा शब्द फक्त जाहिरातीत उरला असून वास्तवात रेट चालतोय का, असा संतप्त सवाल सामान्य नागरिक विचारू लागले आहेत. राज्य आणि केंद्र सरकारने आता केवळ चौकशी समित्या नेमून हात झटकण्याची वेळ संपली आहे. बीडसह ज्या–ज्या भागांचे नाव या घोटाळ्यात पुढे येत आहे, तिथे आर्थिक व्यवहार, कोचिंग नेटवर्क, परीक्षा केंद्रे आणि संशयित दलाल यांची सखोल चौकशी झाली पाहिजे. दोषींना केवळ अटक करून चालणार नाही, तर त्यांच्या संपत्तीची चौकशी, राजकीय संबंध आणि संपूर्ण रॅकेट उघडे केले पाहिजे. आज प्रश्न फक्त नीट चा नाही, प्रश्न देशाच्या भावी डॉक्टरांच्या गुणवत्तेचा आहे. पैशाने मेडिकल सीट विकत घेणारी व्यवस्था उद्या समाजाच्या जीवाशी खेळणारे डॉक्टर निर्माण करेल, ही भीती दुर्लक्षित करून चालणार नाही. शिक्षण जर बाजार झाले, तर देशाची नैतिकता संपायला वेळ लागणार नाही. बीडचे नाव पुन्हा एका घोटाळ्याशी जोडले जात असेल, तर ही केवळ त्या जिल्ह्याची बदनामी नाही, हा संपूर्ण राज्यासाठी इशारा आहे. आता तरी सरकार, तपास यंत्रणा आणि समाजाने जागे व्हावे. अन्यथा उद्या परीक्षा हा शब्द विद्यार्थ्यांसाठी आशेचा नव्हे, तर भीतीचा विषय बनेल.

# शनि अमावस्या व शनि जयंतीनिमित्त श्रीक्षेत्र शनि मंदिरात भक्तांची प्रचंड गर्दी

## हजारो भाविकांनी घेतले शनि महाराजांचे दर्शन; तेल अभिषेक, महाप्रसाद व विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात

बीड । प्रतिनिधी

**साडेतीन शक्तीपीठांपैकी एक मानल्या जाणार्‍या बीड शहरातील पेठ बीड भागातील प्रसिद्ध श्रीक्षेत्र शनि मंदिर येथे आज शनिवार दि. १६ मे २०२६ रोजी शनि अमावस्या तसेच शनि जयंतीनिमित्त हजारो भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने शनि महाराजांचे दर्शन घेतले. सकाळपासूनच मंदिर परिसरात भक्तांची मोठी गर्दी पाहायला मिळाली होती. सकाळी ७ वाजल्यापासून दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.**

यंदाची शनि अमावस्या शनिवारी आल्याने धार्मिक दृष्ट्या विशेष योग मानला जात असून, याच दिवशी शनि महाराजांची जयंतीदेखील साजरी करण्यात आली. हिंदू धर्मशास्त्रानुसार ज्येष्ठ अमावस्येला भगवान शनिदेवांचा जन्म झाल्याची मान्यता असल्याने या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे राज्यासह परिसरातील विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने बीड येथील श्रीक्षेत्र शनि मंदिरात दाखल झाले होते. मंदिरात मध्यरात्री १२ वाजल्यापासून शनिदेवांना तेलाचा अभिषेक सुरू करण्यात आला होता. पहाटेपर्यंत अखंड अभिषेक, मंत्रोच्चार व धार्मिक विधी सुरू होते. मंदिर परिसर 'जय शनिदेव', 'शनि महाराज की जय' अशा जयघोषांनी दुमदुमून गेला होता. भाविकांनी काळे तीळ, तेल, फुले, नारळ अर्पण करून शनिदेवांची पूजा केली. यावेळी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी मंदिरात अभिषेक करून शनि महाराजांचे दर्शन घेतले. हेमंत क्षीरसागर तसेच शुभम धूत यांच्यासह मान्यवरांनी दर्शन घेतले त्यांनी मंदिर परिसरातील



धार्मिक कार्यक्रमात सहभागी होत भाविकांना शनि जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. उन्हाचा वाढता तडाखा लक्षात घेता मंदिर संस्थानच्या वतीने भाविकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. दर्शन रांगेत उभ्या असलेल्या भक्तांना उष्णतेचा त्रास होऊ नये यासाठी तुषार सिंचनाच्या फवार्‍यांची व्यवस्था करण्यात आली होती. तसेच पिण्याच्या पाण्याची व सावलीचीही उत्तम सोय करण्यात आली होती. मंदिर प्रशासनाच्या या उपक्रमाचे भाविकांकडून कौतुक करण्यात आले. दरम्यान, एका भक्ताने शनि महाराजांना चांदीचा आकर्षक मुखवटा अर्पण केला. या मुखवट्यामुळे मंदिरातील मूर्तीचे सौंदर्य अधिक खुलून दिसत होते. मंदिर परिसर फुलांची सजावट व विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजनही करण्यात आले होते. मंदिर संस्थानच्या वतीने सुमारे ३० किलो खिचडीचे वाटप करण्यात आले, तर ५ हजार लाडूंचा प्रसाद भाविकांना देण्यात आला. हजारो भक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला. दिवसभर मंदिर परिसरात भक्तांची गर्दी कायम होती. शनि अमावस्या व शनि जयंतीच्या निमित्ताने भक्तांनी शनिदेवांच्या चरणी प्रार्थना करत सुख–समृद्धी, आरोग्य व संकटमुक्त जीवनासाठी साकडे घातले. धार्मिक उत्साह, भक्तिभाव आणि सुव्यवस्थित नियोजनामुळे यंदाचा शनि जयंती सोहळा अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात पार पडला.

# लिंबागणेशच्या राष्ट्रीय महामार्गावर मृत्यूचा सापळा; भीषण अपघातात दोघांचा जागीच मृत्यू

## कार व दुचाकीची समोरासमोर धडक; नागरिकांकडून गतिरोधक व सुरक्षा उपायांची जोरदार मागणी





नेकनूर । प्रतिनिधी

**बीड तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग ५४८ डी अहिल्यानगर–अहमदपूर मार्गावरील लिंबागणेश येथे शुक्रवारी मध्यरात्री भीषण अपघात घडून दुचाकीवरील दोघांचा जागीच मृत्यू झाला. अपघात एवढा भीषण होता की यामधील मृतांना हॉस्पिटलमध्ये नेण्याचा अवधी मिळाला नाही.**

भालचंद्र विद्यालय परिसरात कार आणि दुचाकी यांच्यात समोरासमोर झालेल्या जोरदार धडकेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शुक्रवार दि. १५ मे रोजी रात्री पाऊणे बारा वाजण्याच्या सुमारास टाटा कंपनीची विस्टा कार (क्र. एमएच ०५ एएक्स ०३८८) आणि हिरो स्प्लेंडर दुचाकी (क्र. एमएच ४४ एए ६२२६) यांच्यात समोरासमोर भीषण धडक झाली. अपघात इतका गंभीर होता की दुचाकीवरील दोन्ही प्रवाशांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. धडकेनंतर दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले. नेकनूर पोलीस स्टेशनचे सहायक फौजदार विठ्ठल राठोड व इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने जिल्हा रुग्णालय, बीड येथे हलविण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून दोघांनाही मृत घोषित केले. या अपघातात मृत्यूमुखी पडलेले दुचाकीस्वार बबन काशिनाथ लगास आणि ज्ञानदेव विष्णू लगास (दोघे रा. चिखलबीड, ता. जि. बीड) असल्याची माहिती समोर आली आहे.



मुंबई – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासमवेत मंत्रालय, मुंबई येथे 'मुंबई क्लायमेट वीक २०२६ इम्पॅक्ट रिपोर्ट'चे प्रकाशन केले. यावेळी मंत्रिमंडळातील इतर सदस्य व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# मान्सून तोंडावर; बीड शहरातील नाली सफाई संथगतीने, नागरिकांमध्ये संताप

बीड । प्रतिनिधी

**मान्सून अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असताना बीड शहरातील नाली साफसफाईची कामे अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शहरातील आदर्श मार्केट, सुभाष रोड, भाजी मंडई, भोपळे हॉस्पिटल परिसर तसेच सहयोग नगर भागात थोड्याशा पावसातही रस्त्यांवर पाणी साचत असून नागरिकांचे जनजीवन विस्कळीत होत आहे. महत्त्वाच्या व्यापारी आणि रहिवासी भागांमध्ये अशी गंभीर परिस्थिती निर्माण होत असतानाही नगर परिषद प्रशासन आणि स्वच्छता विभागाकडून अपेक्षित गतीने काम होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.**

आदर्श मार्केट आणि सुभाष रोड हा शहरातील अत्यंत वर्दळीचा व्यापारी परिसर मानला जातो. मात्र येथील अनेक नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचलेला असून साफसफाईची कामे अर्धवट अवस्थेत असल्याचे दिसून येत आहे. अनेक ठिकाणी नाल्यांमधून काढलेला कचरा दिवसन्दिवस रस्त्याच्या कडेला टाकून ठेवण्यात आल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छतेचे साम्राज्य निर्माण झाले आहे. विशेषतः भोपळे हॉस्पिटल परिसरात पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात पाणी साचत असल्याने त्या भागातील नागरिक, रुग्ण, नातेवाईक तसेच वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. रुग्णवाहिका आणि आपत्कालीन सेवांनाही याचा फटका बसत असून अनेकदा नागरिकांना जीव धोक्यात घालून पाण्यातून मार्ग काढावा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. या परिसरातील साचलेले पाणी पुढे सहयोग नगर भागात जात असल्याने तेथील नागरिकांनाही गंभीर समस्यांचा सामना करावा लागत आहे. दरवर्षी नाली साफसफाईसाठी लाखो रुपयांचा निधी खर्च केला जात असला तरी प्रत्यक्षात ही कामे केवळ कागदोपत्रीच होत आहेत का? असा सवाल संतप्त नागरिक उपस्थित करत आहेत. शहरातील अनेक भागांमध्ये अजूनही नाली साफसफाई पूर्ण झालेली नसताना स्वच्छता विभाग नेमके काय करत आहे, असा प्रश्नही नागरिकांकडून विचारला जात आहे. नागरिकांनी स्वच्छता सभापतींच्या कामकाजावर तीव्र नाराजी व्यक्त करत फक्त बैठका आणि घोषणा करून शहर स्वच्छ होत नाही, प्रत्यक्ष काम दिसले पाहिजे, अशी आक्रमक भूमिका घेतली आहे. मान्सून सुरू होण्यापूर्वी तात्काळ नाली साफसफाई, पावसाळी दुरुस्ती आणि पाण्याचा निचरा होण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात याव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही नागरिकांनी दिला आहे. यासंदर्भात सौ. मनीषा उल्हास गिराम यांनी नगर परिषद प्रशासनाकडे लेखी निवेदन सादर करून संबंधित परिसरातील सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली आहे.

# समस्या सांगा–समाधान मिळेल–तहसीलदार शेळके

## अंथरवन पिंपरी येथे तहसीलदार राजस्व अभियान संपन्न; नागरिकांना सर्व सेवा देण्याचा जिल्हाधिकारी यांचा निर्धार

बीड । प्रतिनिधी

**शासनाच्या महसूल व वन विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत अंथरवन पिंपरी येथील हरकुबाबा देवस्थान ( मठ ) येथे १३ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान समाधान शिबिर आयोजित करण्यात आले होते .**

या शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देऊन मोठ्या प्रमाणात उपस्थिती दर्शवली . अंथरवन पिंपरी येथील हरकुबाबा देवस्थान ( मठ ) येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरामध्ये शेतकरी , विद्यार्थी , ग्रामस्थ तसेच विविध सामाजिक घटकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत शासनाच्या विविध सेवांचा लाभ घेतला . राज्य शासनाने महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , पारदर्शक व गतिमान करण्याच्या उद्देशाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने हे अभियान सुरू केले आहे . नागरिकांना महसूल विभागाच्या विविध सेवा त्यांच्या गावातच उपलब्ध करून देणे , प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करणे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे . त्यानुषंगाने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी तसेच बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव स्वतः अनेक ठिकाणी उपस्थित राहून अभियानाचा आढावा घेत असतात . अंथरवन पिंपरी येथे आयोजित शिबिराने या उद्दिष्टांना प्रत्यक्ष स्वरूप दिल्याचे चित्र पाहायला मिळाले . या कार्यक्रमाचे आयोजन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते . कार्यक्रमास बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांची प्रमुख उपस्थिती लाभली . कार्यक्रमाच्या वेळी बीडचे गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप , नायब तहसीलदार सुहास हजारे , प्रशांत जाधवर , संजय गांधी विभागाचे अण्णासाहेब वंजारे , सुरेंद्र डोके , संभाजी थोटे ; मंडळ अधिकारी वंदना विघ्ने , पुरुषोत्तम आंधळे , सचिन सानप , ग्राम महसूल अधिकारी अक्षय डोफे , सुरेश ठाकूर , विलास शिंदे , परमेश्वर काकडे , ज्योती बोधवड , काजल ससाणे तसेच तालुक्यातील मंडळ अधिकारी व तलाठी यांची उपस्थिती होती . कार्यक्रमाची रूपरेषा मांडताना तहसीलदार शेळके यांनी शिबिराचे महत्त्व व उद्देश याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले . हे शिबिर सर्वसामान्य नागरिक व शेतकरी यांच्यासाठी कसे उपयुक्त आहे , हे सविस्तर सांगितले . नवीन शासन निर्णयांची माहिती दिली . तसेच बालविवाह रोखण्यासाठी सर्व उपस्थितांना आवाहन केले . या कार्यक्रमासाठी अंथरवन पिंपरी हरकुबाबा देवस्थानचे महाराज ह . भ . प . नवनाथ बाबा , सामाजिक कार्यकर्ते कुंडलिक बापू खांडे , अंथरवन पिंपरीचे माजी पंचायत समिती सदस्य नवनाथ प्रभाळे , अंथरवन पिंपरीचे सरपंच जालिंदर शिंदे , अंथरवन पिंपरी तांडा येथील सरपंच दिनेश पवार , खांडेपारगावचे सरपंच रामेश्वर आणेराव , उपसरपंच अशोक शिंदे , अनिल आबा आमटे , गंगानाथवाडीचे सरपंच अरुण भाऊ बोंगाने , गुंधावाडीचे सरपंच रमेश चन्ने , वडगावचे सरपंच सुधाकर नागरगोजे , उपसरपंच अशोक घुगे तसेच भाऊराव प्रभाळे , सुशांत पवार , लक्ष्मण शिंदे , दत्ता सुरवसे , रमेश आमटे , रामेश्वर अवघड , अशोक डोईफोडे , विभीषण डोईफोडे , रमेश कानडे , सुभाष खांडे उपस्थित होते . कार्यक्रमावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून या शिबिराचा सर्वांनी लाभ घेण्याबाबत आवाहन केले . तसेच कार्यक्रमास महसूल मंडळातील आजी – माजी सरपंच तसेच महसूल विभागातील व इतर विभागांतील अधिकारी – कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . म्हाळसजवळा महसूल मंडळातील सर्व गावांचे उपसरपंच , पोलीस पाटील , ग्रामपंचायत सदस्य , ग्रामपंचायत अधिकारी , सहाय्यक कृषी अधिकारी , महसूल सेवक , महावितरण कर्मचारी , आरोग्य विभाग कर्मचारी , अंगणवाडी पर्यवेक्षिका , अंगणवाडी सेविका , आशा कार्यकर्त्या , शेतकरी गट , विद्यार्थी व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने या शिबिरात सहभागी झाले . नागरिकांच्या मोठ्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला लोकाभिमुख स्वरूप प्राप्त झाले . भूमी अभिलेख विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांची स्वतंत्र नोंद घेतली . या शिबिराच्या माध्यमातून विविध विभागांचे माहितीपर स्टॉल उभारण्यात आले होते . महसूल विभागाशी संबंधित जमीन नोंदणी , वारस नोंद , डिजिटल सातबारा उतारे , विविध दाखले व प्रमाणपत्रे तसेच शासनाच्या विविध योजनांची माहिती नागरिकांना देण्यात आली . नागरिकांनी आपल्या अडचणी मांडल्या आणि संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांना आवश्यक मार्गदर्शन केले . शिबिरामध्ये महसूल विभागाच्या विविध सेवांचा लाभ नागरिकांना देण्यात आला . यामध्ये जिवंत सातबारा , मयत खातेदार कमी करणे , वर्ग दोनचे वर्ग एकमध्ये रूपांतर , वारस फेरफार , पाणी नोंद , नोंदणी प्रक्रिया , वसुली पावत्या , सेवामित्र प्रमाणपत्र , प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र , पानंद रस्ते योजना , रस्त्यांच्या नोंदी , केवायसी प्रक्रिया , आधार शिबिर , लाभ योजना माहिती , अभिलेख दुरुस्ती , मोफत आरोग्य तपासणी , घरकुल मंजुरी , गायरान मंजुरी आदेश तसेच शेततळे योजनांची माहिती देण्यात आली . याशिवाय डिजिटल सातबारा उताऱ्यांचे वाटप , विविध योजनांतील प्रमाणपत्रांचे वितरण तसेच मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली . संजय गांधी निराधार योजना व श्रवणबाळ योजना लाभार्थ्यांसाठी विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या . लाभार्थ्यांना हयात प्रमाणपत्र देण्याची सुविधा उपलब्ध झाल्यामुळे अनेक नागरिकांना मोठा दिलासा मिळाला . प्रास्ताविक करताना मंडळ अधिकारी वंदना विघ्ने यांनी नमूद केले की , गावकऱ्यांपर्यंत जाऊन आम्ही सेवा देण्याचा प्रयत्न करत आहोत . यामुळे गोरगरीब लाभार्थ्यांना निश्चितच लाभ होईल . तसेच त्यांनी नमूद केले की , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीडला नियुक्ती झाल्यापासूनच अशा प्रकारच्या योजना सुरू केल्या असून त्याचाही लाभ जनतेला मोठ्या प्रमाणात मिळालेला आहे . एकंदरीत रित्या या शिबिरास नागरिकांनी भरभरून प्रतिसाद दिल्यामुळे या शिबिराचे सकारात्मक फलित पाहायला मिळाले.

## पान १ वरून....

### उष्णतेचा कहर महाराष्ट्रात

कुटुंबियांना शासकीय मदत मिळाली का ? अधिकृतरीत्या घोषित उष्णतेच्या परिस्थितीत मृत्यू सिद्ध झाल्यास काही राज्यांमध्ये ४ लाख रुपयांपर्यंत मदतीची तरतूद आहे. मात्र महाराष्ट्रात याबाबत स्पष्ट आणि एकसंध धोरण अद्याप दिसत नाही. उष्माघाताचा मृत्यू अधिकृत ठरवण्यासाठी गुंतागुंतीची प्रक्रिया असल्याने अनेक कुटुंबे मदतीपासून वंचित राहतात, असे तज्ज्ञ सांगतात. महाराष्ट्र सरकारने यापूर्वी खारघर येथील महाराष्ट्र भूषण सोहळ्यात उष्माघातामुळे मृत्यू झालेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. पण सामान्य शेतकरी, मजूर, फेरीवाले किंवा उन्हात काम करणाऱ्या गरीब कामगारांच्या मृत्यूकडे मात्र सरकारची संवेदनशीलता तितक्याच ताकदीने दिसत नसल्याचा आरोप विरोधक आणि सामाजिक संघटना करत आहेत. आज राज्यातील लाखो मजूर, बांधकाम कामगार, शेतकरी आणि फेरीवाले प्रखर उन्हात जीव धोक्यात घालून काम करत आहेत. त्यांच्या सुरक्षिततेसाठी कोणती ठोस योजनाते आहे ? ग्रामपंचायत ते महानगरपालिका स्तरावर 'हीट ॲक्शन प्लॅन' किती प्रभावी आहे ? शाळा, बाजारपेठा आणि बांधकाम साईटवर उष्णतेपासून संरक्षणासाठी कोणती सक्ती करण्यात आली? या प्रश्नांची उत्तरे सरकारने जनतेसमोर ठेवणे गरजेचे आहे. उष्णता आता फक्त ऋतू राहिलेली नाही ती आपत्ती बनत चालली आहे. आणि ही आपत्ती गरीबांचा जीव घेत आहे. सरकारने केवळ आकडे मोजण्याऐवजी प्रत्येक मृत्यूमागची सामाजिक वेदना समजून घेतली पाहिजे. अन्यथा उद्या उन्हाने होणारे मृत्यू हे नैसर्गिक नसून प्रशासकीय दुर्लक्षामुळे झालेले मृत्यू म्हणून ओळखले जातील.

----------

### वीरशैव लिंगायत समाजातील इयत्ता दहावी

तात्काळ नोंदणी करून या उपक्रमाला बळ द्यावे असे आवाहन जगद्विवेक प्रतिष्ठानचे अध्यक्ष विकास विवेक स्वामी, सचिव वैभव विवेक स्वामी,सर्वश्री विश्वस्त सौ वैशाली अशोक पडोळे धर्माबाद, सौ रुपाली श्रीकांत स्वामी लातूर, सौ वनमाला विकास स्वामी, सौ वर्षा वैभव स्वामी,प्रशांत माणिक स्वामी,सतीश गंगाधर स्वामी,विलास स्वामी, अशोक स्वामी, दिलीप स्वामी, चंदाराणी स्वामी सह समस्त येळंबकर स्वामी परिवार यांनी केले आहे.

-------------

### लातूर जिल्ह्यातील शासकीय निवासी

शाळेत अर्ज सादर करणे आवश्यक आहे, त्यानंतर १ जून २०२६ रोजी पहिली निवड यादी प्रसिद्ध केली जाईल. प्रवेशित विद्यार्थ्यांना शासनाकडून शैक्षणिक साहित्य, निवास, भोजन, गणवेश आणि ट्रंक सूट यांसारख्या सर्व सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जाणार असल्याने, अधिक माहितीसाठी विद्यार्थ्यांनी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक किंवा समाज कल्याण सहायक आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा.

----------

### दहावी, बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा पत्रकार

शेख ताहेर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष दीपक काळकुटे, अँड विनायक जाधव, जिल्हा सरचिटणीस शेख वसीम, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा सचिव शेख अब्दुल, रईस खान,शेख आयुब, प्रसिद्धी प्रमुख रामभाऊ काशीद, जिल्हा कार्याध्यक्ष अमोल कापसे,जिल्हा सहसचिव अमोल शिंदे,डिजिटल मीडियाचे जिल्हाध्यक्ष अनिल आगुंडे आदींनी केले आहे.

-------------

### धनदांडग्यांना, पुढाऱ्यांना पायघड्या

शहरातील अनेक भागांमध्ये नियमांचे उल्लंघन करून उभारण्यात आलेल्या अतिक्रमणांविरोधात सामाजिक संघटना व कार्यकर्त्यांनी वारंवार आंदोलने आणि निवेदने दिली आहेत. मात्र नगरपरिषद आणि जिल्हा प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगत आहे. आर्थिक साटेलोटे आणि राजकीय दबावामुळेच मोठ्या अतिक्रमणधारकांना अभय दिले जात असल्याचा आरोपही होत आहे. कायदा सर्वांसाठी समान असावा. गोरगरीबांवर कारवाई आणि धनदांडग्यांना पायघड्या हा प्रकार थांबला पाहिजे. अतिक्रमण हटाव मोहिमेत दुजाभाव न करता सर्वांवर समान निकष लावले गेले पाहिजेत, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

----------

## पान ६ वरून....

### महाज्योती आता यशाचा

संस्थेच्या पारदर्शक प्रशिक्षण प्रणालीला दिले आहे. संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना मुख्य परीक्षेसाठी ५० हजार रुपये आणि मुलाखतीच्या तयारीसाठी २५ हजार रुपयांचे आर्थिक साहाय्य देण्यात आले होते. याशिवाय अनुभवी तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सराव मुलाखती आणि अद्ययावत अभ्यास साहित्यामुळे या विद्यार्थ्यांनी हे यश मिळवले आहे. 'महाज्योती'साठी १०० यशस्वी विद्यार्थ्यांचा टप्पा ही केवळ एक संख्या नसून, सामाजिक परिवर्तनाच्या वाटचालीतील एक मोठी क्रांती आहे. 'महाज्योती'मुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या आशा–आकांक्षांना नवी दिशा मिळाली आहे. या उत्तुंग कामगिरीबद्दल राज्यभरातून यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक होत असल्याचेही मिलिंद नारिंगे यांनी सांगितले आहे.

----------

# सिंहस्थ कुंभमेळासाठी प्रति आखाडा पाच कोटी

## कुंभच्या यशस्वी आयोजनासाठी निधी कमी पडू देणार नाही–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई। प्रतिनिधी**

**नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा हा महाराष्ट्रासाठी सेवेचा आदर्श निर्माण करण्याची संधी आहे. आखाड्यांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध होण्यासाठी प्रति आखाडा पाच कोटींचा निधी, छोट्या संस्थानसाठी प्रति संस्थान १५ लाख रुपये, आखाड्यांच्या वीज देयकाची प्राधिकरणाच्या माध्यमातून अदायगी, आखाड्याची जमीन शासकीय कामासाठी अधिग्रहित केल्यास आखाड्यांना मोबदला किंवा जमीन देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केली.**

कुंभमेळ्यासाठी जगभरातून येणाऱ्या साधू, महंत व भाविक यांची सेवा करीत त्यांच्या मार्गदर्शनातून कुंभमेळ्याचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित सिंहस्थ कुंभमेळा आढावा बैठकीत सांगितले. बैठकीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, कुंभ मेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिह राजे भोसले आदी उपस्थित होते. बैठकीमध्ये कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी साधू महंतांनी दिलेल्या सूचना स्वागतार्ह असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, साधू, महंतांनी जे चांगले काम होत आहे, त्याचे कौतुक केले आहे. तसेच जे काम अधिक गतीने आणि परिणामकारक व्हायला पाहिजे, त्यासाठी सूचना केल्या आहेत. साधू महंतांच्या बैठकीतील सविस्तर चर्चेने कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी निश्चितच मदत होणार आहे. कुंभमेळ्याच्या व्यवस्थेसाठी बृहद नियोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुढील वर्षी होत असलेल्या कुंभमेळ्याचे नियोजन आणि तयारी ही केवळ याच कुंभमेळ्यासाठी नसून ती पुढील १२ वर्षांनी येणाऱ्या कुंभमेळ्यासाठी असणार आहे, या पद्धतीने आखलेल्या नियोजनाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. पुढील काळात व्यवस्थेला या कुंभमेळ्यासाठी उभारलेल्या कामातूनच पुढील व्यवस्था उभाराव्या लागतील, अशा पद्धतीने काम करण्यात येत आहे. कुंभमेळा निमित्ताने नाशिक व त्र्यंबकेश्वर परिसरात स्थायी स्वरूपात विकासकामे होतील, याचाच प्राधान्याने विचार होत आहे. कुंभमेळा हा भविष्यातही विस्तारणारा असल्याने त्या पद्धतीने व्यवस्थांची उभारणी करण्यात येत आहे. कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी यावेळी सादरीकरण केले. बैठकीला मुख्य सचिव राजेश अग्रवाल, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नाशिकचे विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, नाशिक येथील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, १३ आखाड्यांचे महंत व साधू उपस्थित होते. यावेळी आखाड्यांचे महंत यांनी विचार मांडले. बैठकीच्या सुरुवातीला त्र्यंबकेश्वर येथील मंदिराच्या दर्शन पथाचे ई भूमिपूजन करण्यात आले.

### कुंभमेळ्याच्या सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड नको–उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

त्रंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी राज्यशासन सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. हे आयोजन अत्यंत दिमाखदार स्वरूपात पार पडेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त करीत या कुंभमेळ्याच्या सुरक्षतेबाबत कुठलीही तडजोड खपवून घेणार नाही, असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. भाविकांची सुरक्षा, सुविधा आणि आखाड्यांच्या मागण्यांबाबतही निर्देश दिले.

# मतदार यादीच्या विशेष पुनरीक्षण मोहिमेची घोषणा

## महाराष्ट्रातील ९.८६ कोटी मतदारांची पडताळणी होणार?

**नवी दिल्ली। वृत्तसंस्था**

**भारतीय निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष संक्षिप्त पुनरीक्षण – तिसरा टप्पा' (डखठ झहरीश–खखख) राबवण्याचे अधिकृत आदेश दिले आहेत. या महत्त्वाकांक्षी मोहिमेत महाराष्ट्राचा प्रामुख्याने समावेश असून, राज्यातील सुमारे ९ कोटी ८६ लाख ६४ हजार ४१३ मतदारांच्या नोंदी अद्ययावत केल्या जाणार आहेत. चालू असलेल्या जनगणनेच्या 'हाऊस लिस्टिंग' प्रक्रियेचा विचार करून आयोगाने हे वेळापत्रक आखले असून, हवामानाची प्रतिकूलता लक्षात घेता केवळ हिमाचल प्रदेश, जम्मू–काश्मीर आणि लडाख या भागांना या टप्प्यातून वगळण्यात आले आहे.**

महाराष्ट्रातील या मोहिमेसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून एकूण ९७,९२४ बूथ लेव्हल ऑफिसर्स (इङज) घरोघरी जाऊन मतदारांच्या माहितीची प्रत्यक्ष पडताळणी करणार आहेत. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांच्या ९६,९४९ बूथ लेव्हल एजंट्सची (इङ–) मदत घेतली जाणार आहे. आयोगाच्या वेळापत्रकानुसार, २० जून ते २९ जून २०२६ या काळात अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण पूर्ण होईल, त्यानंतर ३० जूनपासून प्रत्यक्ष घरोघरी भेटी देऊन पडताळणी करण्याच्या कामाला सुरुवात होणार आहे. ही मोहीम २९ जुलैपर्यंत चालेल.राज्यातील मतदारांसाठी ५ ऑगस्ट २०२६ ही तारीख महत्त्वाची ठरणार आहे, कारण याच दिवशी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. यानंतर ४ सप्टेंबरपर्यंत नागरिकांना आपल्या नावातील दुरुस्ती, पत्ता बदल किंवा नवीन नाव नोंदणीसाठी दावे आणि हरकती सादर करता येतील. सर्व हरकतींचा निपटारा केल्यानंतर ७ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्राची अंतिम मतदार यादी अधिकृतपणे प्रसिद्ध केली जाणार आहे. निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले प्रतिनिधी नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे, जेणेकरून ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक आणि सर्वसमावेशक होईल. या मोहिमेमुळे आगामी निवडणुकांसाठी राज्याकडे एक त्रुटी मुक्त आणि अद्ययावत मतदार डेटाबेस उपलब्ध होणार आहे. पहिल्या दोन टप्प्यांत देशातील ५९ कोटी मतदारांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झाली असून, आता तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि पंजाब यांसारख्या मोठ्या राज्यांमध्ये कामाला वेग येणार आहे.

# 'पल्स २०२७' साठी स्वतंत्र कंपनी व दुहेरी समित्यांची स्थापना – वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई। प्रतिनिधी**

**वैद्यकीय शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात राज्याला जागतिक स्तरावर सक्षम करण्याच्या उद्देशाने आगामी 'पल्स २०२७' परिषदेसाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याबरोबरच दोन स्वतंत्र समित्या गठीत करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. यासंदर्भातील शासन निर्णय पुढील चार ते पाच दिवसांत जारी करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.**



मंत्रालयात आयोजित आढावा बैठकीत 'पल्स २०२७'च्या नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीस वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण आयुक्त अनिल भंडारी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. वैद्यकीय शिक्षण मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले की, 'पल्स २०२७'च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अधिकाऱ्यांची एक समिती आणि शासन स्तरावरील दुसरी समिती स्थापन करण्यात येणार आहे. तसेच पुढील पाच वर्षांसाठी कृती आराखडा तयार करून 'पल्स' उपक्रमाच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याचा प्रस्ताव सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.ही कंपनी स्थापन झाल्यानंतर सीएसआर निधी, आर्थिक व्यवहार, विविध गुंतवणूक प्रस्ताव तसेच सामंजस्य करारांच्या अंमलबजावणीचा पाठपुरावा अधिक सुलभ होईल, असेही मंत्री मुश्रीफ यांनी नमूद केले. यावर्षी आयोजित करण्यात आलेल्या 'पल्स २०२६' परिषदेला देश–विदेशातील सुमारे ४ हजार ६०० प्रतिनिधी उपस्थित राहिले. परिषदेदरम्यान २५ हून अधिक समांतर सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. राज्य शासन, शैक्षणिक संस्था, उद्योग क्षेत्र आणि आंतरराष्ट्रीय भागीदारांच्या सहभागातून 'महाराष्ट्र डिक्लरेशन' स्वीकारण्यात आले असून पुढील पाच वर्षांसाठी 'महाराष्ट्र चार्टर'ही जाहीर करण्यात आले. 'पल्स २०२६'मध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांसोबत १५ सामंजस्य करार करण्यात आले. वैद्यकीय शिक्षण, कौशल्य विकास, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल हेल्थ, संशोधन आणि वैद्यकीय पर्यटन क्षेत्रातील या करारांमुळे लाइफ सायन्स व हेल्थटेक क्षेत्रात सुमारे ७२० कोटी रुपयांच्या गुंतवणुकीला चालना मिळाल्याचे मंत्री मुश्रीफ यांनी सांगितले. दरम्यान, 'पल्स २०२७'साठी १० हजार प्रतिनिधींच्या सहभागाचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून ५० सामंजस्य करारांद्वारे सुमारे २ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न राहणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

# महाराष्ट्रात १.१४ लाख कोटींची गुंतवणूक तर ८,००० जणांना मिळणार रोजगार!

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत उद्योग विभाग आणि एएम इंटेलिजन्स लॅब यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई प्रतिनिधी**

**राज्याच्या औद्योगिक आणि तंत्रज्ञान क्षेत्राला मोठी गती देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत उद्योग विभाग आणि 'एएम इंटेलिजन्स लॅब्ज प्रायव्हेट लिमिटेड' समवेत १ लाख १४ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचा सामंजस्य करार झाला.**

मुख्यमंत्री समिती कक्षात झालेल्या या कराराच्या वेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी. अन्बळगण, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, सहसचिव डॉ.श्रीकांत पुलकुंडवार, सहसचिव लक्ष्मीकांत ढोके, एएम इंटेलिजन्स लॅब्जचे अध्यक्ष अनिल चलमलाशेट्टी, संचालक मौर्य पायदा, उपाध्यक्ष पंकज कुमार आदी उपस्थित होते. या प्रकल्पामुळे राज्यात तब्बल ८ हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहे.

या सामंजस्य करारामुळे मुंबई महानगर प्रदेशात (MMR) 'इंटिग्रेटेड ग्रीन डेटा सेंटर पार्क' आणि 'एआय कॉम्प्युट हब' उभारला जाणार आहे. यासाठी कंपनी १,१४,००० कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. हा प्रकल्प पूर्णपणे अक्षय ऊर्जेवर आधारित असेल, ज्यामुळे पर्यावरणाचे रक्षणही होईल.उच्च तंत्रज्ञान क्षेत्रात कुशल आणि निमकुशल अशा ८ हजार तरुणांना रोजगाराची संधी मिळणार आहे. यामध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर्स, डेटा सायंटिस्ट आणि ऑपरेशन्स टीमचा समावेश असेल. प्रकल्पाच्या बांधकाम कालावधीत सुमारे २ हजार अतिरिक्त रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.हा प्रकल्प ५०० मेगावॅट क्षमतेचा असून यामध्ये २,५०,००० उच्च क्षमतेचे 'एआय चिपसेट्स' वापरले जातील. तसेच या प्रकल्पाचा दोन टप्प्यांत विकास करण्यात येईल. २०० मेगावॅट क्षमतेचा पहिला टप्पा सन २०२८ पर्यंत तर ३०० मेगावॅट क्षमतेचा दुसरा टप्पा २०३० पर्यंत पूर्ण करण्यात येणार उद्दिष्ट आहे.हा प्रकल्प राज्याच्या माहिती तंत्रज्ञान धोरण २०२३ तसेच हरित एकात्मिक डेटा सेंटर पार्क धोरण २०२४ अंतर्गत विकसित करण्यात येणार आहे. महाराष्ट्राला कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रात राष्ट्रीय व जागतिक स्तरावर अग्रस्थानी नेण्याचा उद्देश या प्रकल्पामागे आहे.





मुंबई – विधान परिषद साठी निवडून आलेल्या १० सदस्यांचा शपथविधी समारोह विधान भवनात मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

# लातूर जिल्ह्यातील टंचाईग्रस्त भागात २ टँकर, ६३ विहिरींद्वारे पाणीपुरवठा

लातूर। प्रतिनिधी

सध्या जिल्ह्यातील ग्रामीण भागांमध्ये पाणी टंचाईची समस्या जाणवू लागली असून प्रशासनाकडून विविध उपाययोजना राबवल्या जात आहेत. १५ मे रोजीच्या अहवालानुसार जिल्ह्यातील एकूण १० तालुक्यांपैकी जळकोट तालुक्यामध्ये टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू आहे. याठिकाणी २ गावांमध्ये आणि एका वाडीवर पाणी पुरवण्यासाठी २ शासकीय टँकर मंजूर करण्यात आले आहेत. जळकोट तालुक्यासाठी मंजूर करण्यात आलेल्या टँकरच्या दैनंदिन ४ फेऱ्या पूर्ण क्षमतेने सुरू आहेत. यामध्ये प्रामुख्याने शिवाजी नगर तांडा व वाघमारी तांडा आणि गव्हाण गावात टँकरद्वारे पाणी पुरवठा मंजूर करण्यात आला आहे.

संपूर्ण लातूर जिल्ह्यात सध्या ६३ विहिरी व विंधन विहिरींचे अधिग्रहण करण्यात आले असून, यात अहमदपूर तालुक्यात २७, औसा तालुक्यात १५ विहिरी अथवा विंधन विहिरींचे आले आहेत. तसेच उदगीर तालुक्यात ११, चाकूर तालुक्यात ४, जळकोट तालुक्यात ४, लातूर तालुक्यात १ आणि रेणापूर तालुक्यात १ विहीर किंवा विंधन विहीर अधिग्रहित करून गावकऱ्यांना पाणी पुरवठा केला जात आहे. ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या जिल्हा परिषद ग्रामीण पाणी पुरवठा विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांच्या वतीने या संपूर्ण टंचाई निवारण कामावर देखरेख ठेवली जात आहे.

# जणगणनेत वीरशैव शब्द नको, लिंगायत महासंघाच्या बैठकीत निर्णय

**लातूर प्रतिनिधी**

**लिंगायत महासंघाच्या वतीने २०२६–२७ च्या होत असलेल्या जनगणनेत लिंगायत बांधवांनी काय करावे व काय करू नये यासाठी वीरशैव लिंगायत सांस्कृतिक भवन खंडोबा गल्ली लातूर येथे आज लिंगायत समाजाची बैठक आयोजित करण्यात आली होती.**

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी लिंगायत महासंघाचे प्रांतअध्यक्ष प्रा.सुदर्शनराव बिरादार हे होते. या होत असलेल्या जनगणनेत धर्माची नोंद करत असताना वीरशैव शब्द नको असे ठरवण्यात आले. या बैठकीत राष्ट्रीय जनगणना २०२६ ची सुरुवात झाली असल्याचे सांगण्यात आले. या जनगणनेचा पहिला टप्पा स्व जनगणनेचा होता व तो पार पडला असून आता घरोघरी प्रगणक जाऊन घरगणना करणार आहेत व पुढच्या टप्प्यात धर्म आणि जात जनगणना होणार असून या जनगणनेच्या वेळी कॉलम नंबर सातमध्ये जे धर्माच्या इतर कॉलम मध्ये काय लिहावे यासाठी समाजात जागृती होण्यासाठी ही बैठक बोलावण्यात आली होती. लिंगायत समाजाने जनगणनेमध्ये धर्म व जातीची कशी नोंद करावी किंवा काय लिहावे याबाबतीत तीन मतप्रवाह पडलेले आहेत. त्यात एक धर्म वीरशैव लिंगायत लिहावे व जात वाणी, जंगम, तेली, माळी, कुंभार इत्यादी लिहावे तसेच दुसरा प्रवाह धर्म हिंदू व जात लिंगायत, वाणी, तेली, माळी, कुंभार इत्यादी प्रत्येकाच्या कागदपत्रावर जसे आहे असेच लिहावे तर तिसरा मतप्रवाह आहे लिंगायत धर्माला मान्यता मिळवायची असून धर्माच्या रकान्यात लिंगायत लिहावे जातीच्या रकान्यात आपापली जात लिहावी अशा या तीनही मतप्रवाहावर साधक–बाधक चर्चा करून सर्वांना मिळून एक प्रवाह सर्व संमतीने निर्माण व्हावा यासाठी लिंगायत महासंघाकडून प्रयत्न करणार असल्याचे बैठकीत सांगण्यात आले.



या बैठकीत वरील तीनही विचाराचे फायदे तोटे यावर खूप चर्चा झाली आणि सर्वानुमते धर्माच्या कॉलम मध्ये वीरशैव हा शब्द लिहू नये असे ठरले. या बैठकीत कागदपत्रावर नोंद असलेल्या धर्म हिंदू व जात लिंगायत असेच ठेवावे असेही अनेकांनी मते मांडली. त्यात त्यांचे म्हणणे असे होते धर्म लिंगायत झाल्यास जातही लिंगायत आहे धर्म आणि जातीचे नाव एकच कसे राहील म्हणून कागदपत्राची भविष्यकाळात अडचण आली तर काय करावे असेही प्रश्न उपस्थित करण्यात आले. जनगणनेमध्ये धर्म हिंदू लिहायचा की धर्माच्या जागी लिंगायत लिहायचे यावर अजून व्यापक चर्चा घडवून आणून एकमत करण्यासाठी जिल्हाभर व्यापक बैठका घेण्याचे ठरले. तसेच काही मान्यवरांनी जगद्गुरुंचेही मार्गदर्शन घ्यावे असे मत मांडले त्यानुसार जगद्गुरुनाही भेटण्याचा निर्णय लिंगायत महासंघाने घेतला आहे. या बैठकीचे प्रास्ताविक लिंगायत महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश पटणे सर यांनी केले तर लिंगायत महासंघाचे चाकूर तालुका अध्यक्ष सुभाष शंकरे, लिंगायत महासंघाचे जिल्हा मार्गदर्शक जी जी ब्रह्मवाले गुरुजी, अखिल भारतीय वीरशैव महासभेचे जिल्हाध्यक्ष शिवराज शेटकार, अॅड.मधुकर राजमाने,डॉ. मन्मथ भातांब्रे यांच्यासह अनेकांनी आपली मते मांडली. अध्यक्षीय समारोप लिंगायत महासंघाचे प्रांतअध्यक्ष प्रा. सुदर्शनराव बिरादार यांनी केला. या बैठकीला माणिकअप्पा मरळे, सिद्रामप्पा पोपडे, नागनाथअप्पा भुरके, विश्वनाथप्पा मिटकरी, शिवाप्पा कोरके, महादेव देवशेट्टे, लिंगायत महासंघाचे अहमदपूर तालुका संपर्कप्रमुख शिवकुमार होळदांडगे, लिंगायत महासंघाचे तालुका निलंगा तालुकाध्यक्ष चंद्रकांत डांगे, अशोक काडादी अजय पाटील, महासंघाचे जिल्हासरचिटणीस चंद्रकांत तोळमारे, लिंगेश्वर बिराजदार, लिंगायत महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष तानाजी पाटील भडीकर, सुर्यकांतप्पा हत्ते, शिवकांत गंगापूरे, सविता खिंडे, शिवाप्पा कोरके यांच्यासह अनेक समाज बांधवांची यावेळी उपस्थिती होती. या बैठकीचे सूत्रसंचालन लिंगायत महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी भातमोडे सर यांनी केले तर आभार अहमदपुर तालुका संपर्क शिवकुमार होळदांडगे यांनी मानले.

# महाराष्ट्र शासनाचे महत्त्वपूर्ण निर्णय...

**मागील आठवड्यात राज्याच्या प्रशासन, शेती, पायाभूत सुविधा आणि कायदा–सुव्यवस्थेवर परिणाम करणारे महत्वाचे निर्णय घेत राज्यातील प्रशासनिक यंत्रणा, शेतकरी, महिला सुरक्षा, पायाभूत सुविधा आणि धार्मिक व्यवस्थापन यावर मोठा प्रभाव टाकणाऱ्या घोषणा केल्या. काही निर्णयांवर जनतेने स्वागत केले, तर काही मुद्द्यांवर विरोधकांनी सरकारला लक्ष्य केले आहे. यामध्ये काही ठळक निर्णय याप्रमाणे...,**

### त्र्यंबकेश्वर कुंभमेळ्यासाठी राज्य सरकार तर्फे १२ हजार कोटींच्या विकास आराखड्याला गती

नाशिक – त्र्यंबकेश्वर मंदिर येथे होणाऱ्या आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मोठा निर्णय घेत पायाभूत सुविधा, वाहतूक, सुरक्षा आणि स्वच्छतेसाठी बहुआयामी विकास आराखड्याला गती दिली आहे. नाशिक शहर, त्र्यंबकेश्वर मार्ग आणि गोदावरी घाट परिसरात रस्ते रुंदीकरण, मलनिस्सारण, स्मार्ट निगराणी आणि पार्किंग व्यवस्थेसाठी विशेष निधी मंजूर करण्यात आला. राज्य प्रशासनाने विविध विभागांना 'वॉर रूम मोड'मध्ये काम करण्याचे आदेश दिले आहेत. महिलांच्या सुरक्षेसाठी 'स्मार्ट पेट्रोलिंग' योजना लागू राज्यातील प्रमुख शहरांमध्ये –ख आधारित निगराणी वाढवणार महिलांवरील वाढत्या अत्याचारांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर येथे –ख आधारित स्मार्ट पेट्रोलिंग प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. पोलिस नियंत्रण कक्षांना फेस रिकग्निशन तंत्रज्ञान, स्मार्ट सीसीटीव्ही आणि तातडीच्या प्रतिसादासाठी विशेष डिजिटल नेटवर्कशी जोडले जाणार आहे. महिला सुरक्षा पथकांची संख्याही वाढवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय!

मुंबई – राज्यातील उष्णतेची तीव्रता आणि अपुऱ्या पावसाच्या शक्यतेचा विचार करून सरकारने दुष्काळी तालुक्यांसाठी विशेष कृषी मदत योजना जाहीर केली आहे. ठिबक सिंचन, जलसंधारण आणि पीक विमा योजनांसाठी अतिरिक्त निधी मंजूर करण्यात आला. कृषी विभागाला खरीप हंगामापूर्वी खत आणि बियाण्यांचा पुरेसा साठा उपलब्ध ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### बेकायदेशीर बांधकामांवर बुलडोझर कारवाईची तयारी

मुंबई – राज्यात वाढणाऱ्या अनधिकृत बांधकामांवर नियंत्रण आणण्यासाठी सरकारने सर्व महापालिका आणि नगरपालिकांना विशेष मोहीम राबवण्याचे निर्देश दिले आहेत. धोकादायक इमारती, अतिक्रमणे आणि बेकायदेशीर व्यावसायिक बांधकामांवर तातडीने कारवाई करण्यास सांगण्यात आले आहे. महसूल, नगरविकास आणि पोलिस विभाग संयुक्त कारवाई करणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### आरोग्य विभागात मोठी भरती प्रक्रिया सुरू

मुंबई – राज्यातील सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टर, परिचारिका आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांची कमतरता लक्षात घेऊन आरोग्य विभागाने मोठ्या प्रमाणावर भरती प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सेवा मजबूत करण्यासाठी विशेष करारनियुक्ती प्रक्रियेलाही मंजुरी देण्यात आली आहे.

### मुंबई–पुणे द्रुतगती मार्गावर नवीन सुरक्षा नियम

मुंबई – अपघात रोखण्यासाठी वेग नियंत्रण आणि –ख कॅमेरे बसवणार मुंबई–पुणे द्रुतगती मार्ग वर वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने नवीन सुरक्षा उपाय लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. अतिवेगाने वाहन चालवणाऱ्यांवर स्वयंचलित दंड प्रणाली लागू होणार असून –ख आधारित कॅमेरे आणि रिअल टाइम ट्रॅफिक मॉनिटरिंग प्रणाली बसवली जाणार आहे. महामार्गावर आपत्कालीन वैद्यकीय पथकांची संख्याही वाढवली जाणार आहे.

### सायबर गुन्हे रोखण्यासाठी राज्यस्तरीय विशेष सेल

मुंबई – ऑनलाइन फसवणूक, डिजिटल अटक आणि आर्थिक सायबर गुन्ह्यांमध्ये वाढ होत असल्याने राज्य सरकारने स्वतंत्र सायबर समन्वय यंत्रणा स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात प्रशिक्षित सायबर तपास पथक तयार केले जाणार असून नागरिकांसाठी २४ तास हेल्पलाइनही कार्यान्वित केली जाणार आहे.

### महसूल विभागातील सुनावण्यांसाठी एसओपी लागू

मुंबई – राज्य सरकारने महसूल विभागातील अर्धन्यायिक प्रकरणांच्या सुनावणीसाठी नवीन मानक कार्यपद्धती (एसओपी)लागू केली आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही कार्यपद्धती जाहीर केली. यामध्ये आठवड्यातून किमान दोन वेळा सुनावणी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच सुनावणी पुढे ढकलण्यावर निर्बंध आणण्यात आले असून, सर्व आदेश डिजिटल स्वाक्षरीसह 'ई–क्यूजे न्यायालय' प्रणालीवर अपलोड करणे सक्तीचे करण्यात आले आहे.

### महसूल न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे जलद निकाली काढण्याचा निर्णय

मुंबई – नवीन कार्यपद्धतीनुसार सुनावणी पूर्ण झाल्यानंतर जास्तीत जास्त आठ आठवड्यांत अंतिम आदेश देणे आवश्यक करण्यात आले आहे. यामुळे जमीन वाद, शेतरस्ते, लेखनप्रमाद दुरुस्ती आणि गौणखनिज प्रकरणांतील विलंब कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### महसुली कामकाजात मराठी भाषा सक्तीची

मुंबई – महसूल विभागातील अर्धन्यायिक सुनावणी व आदेशांमध्ये मराठी भाषेचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. ग्रामीण भागातील सामान्य नागरिकांना प्रक्रिया समजण्यासाठी हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे.

### अकृषक (N-) परवानगी प्रक्रियेत मोठी सुलभता

मुंबई – राज्य सरकारने बांधकामासाठी स्वतंत्र 'एन.ए.' परवानगीची सक्ती कमी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय यापूर्वी घेतला असून त्याची अंमलबजावणी गतीने सुरू आहे. बांधकाम आराखड्यालाच परवानगी मानण्याची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे बांधकाम आणि गुंतवणूक प्रक्रियेला वेग मिळणार असल्याचा दावा सरकारने केला आहे.

### शेतजमीन भाडेपट्टा आणि जमीन नोंदींबाबत मार्गदर्शक सूचना

मुंबई – महसूल विभागाने महाराष्ट्र शेतजमीन भाडेपट्टा अधिनियम २०१७ आणि नियम २०२४ च्या अंमलबजावणीसंदर्भात नव्या मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. तसेच रेल्वे आणि वन विभागाच्या जमिनींच्या नोंदी ७/१२ आणि गाव नकाशामध्ये स्पष्टपणे नोंदवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### महसूल प्रशासनात संरचनात्मक बदल

मुंबई – महसूल विभागाच्या नव्या आकृतीबंधानुसार हजारो पदांना मंजुरी देण्यात आली असून, प्रशासनातील कामाचा ताण लक्षात घेऊन विभागांचे पुनर्गठन करण्यात येत आहे. काही जुन्या संवर्गांना मृत संवर्ग घोषित करून डिजिटल प्रशासनाला प्राधान्य देण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे.

## क्रीडा विश्वातील ताज्या घडामोडी...

**दिल्ली – क्रिकेट, हॉकी, कुस्ती, बॅडमिंटन आणि ऑलिम्पिक तयारीमुळे देशभरात क्रीडा वातावरण तापले आहे.देशातील क्रीडाक्षेत्रात मागील आठवडाभरात अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडल्या. क्रिकेटपासून हॉकी, कुस्ती, बॅडमिंटन आणि ऑलिम्पिक तयारीपर्यंत विविध स्तरांवर मोठे निर्णय, निवडी आणि स्पर्धा चर्चेत राहिल्या. भारतीय खेळाडूंच्या कामगिरीकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागले आहे.**

### टी–२० विश्वचषकासाठी भारतीय संघाच्या तयारीला वेग...

मुंबई – भारतीय क्रिकेट संघाने आगामी आयसीसी टी–२० स्पर्धांच्या पार्श्वभूमीवर सराव आणि संघबांधणीला गती दिली आहे. युवा खेळाडूंना संधी देतानाच अनुभवी खेळाडूंवरही विश्वास कायम ठेवण्यात आला आहे. फिटनेस, क्षेत्ररक्षण आणि आक्रमक फलंदाजीवर विशेष भर दिला जात असून संघ व्यवस्थापन आगामी मोठ्या स्पर्धांसाठी रणनीती आखत आहे.

### आयपीएल नंतर युवा खेळाडूंना राष्ट्रीय संघात संधी..

मुंबई – यंदाच्या खझङ हंगामात चमकदार कामगिरी करणाऱ्या अनेक युवा खेळाडूंना भारतीय संघाच्या संभाव्य यादीत स्थान मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. वेगवान गोलंदाज, फिनिशर फलंदाज आणि अष्टपैलू खेळाडूंनी निवड समितीचे लक्ष वेधले आहे. क्रिकेट तज्ज्ञांच्या मते भारतीय संघात आता संक्रमणाची प्रक्रिया वेगाने सुरू झाली आहे.

### भारतीय हॉकी संघाची आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी तयारी

मुंबई – पुरुष आणि महिला भारतीय हॉकी संघांनी युरोप दौऱ्यासाठी विशेष प्रशिक्षण शिबिरे सुरू केली आहेत. आगामी प्रो–लीग आणि ऑलिम्पिक पात्रता स्पर्धा लक्षात घेऊन संघांमध्ये काही महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. पेनल्टी कॉर्नर रूपांतर आणि बचावफळी मजबूत करण्यावर भर दिला जात आहे.

### कुस्ती महासंघ पुन्हा वादाच्या भोवऱ्यात

मुंबई – भारतीय कुस्ती महासंघातील प्रशासकीय वाद पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. खेळाडूंच्या निवड प्रक्रियेतील पारदर्शकतेवर प्रश्न उपस्थित होत असून काही खेळाडूंनी थेट केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडे तक्रारी केल्या आहेत. ऑलिम्पिकपूर्व काळात निर्माण झालेला हा वाद भारतीय कुस्ती क्षेत्रासाठी चिंतेचा विषय ठरत आहे.

### बॅडमिंटनमध्ये भारतीय खेळाडूंची दमदार कामगिरी

मुंबई – भारतीय बॅडमिंटनपटूंनी आशियाई आणि युरोपीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पुरुष दुहेरी आणि महिला एकेरी प्रकारात भारतीय खेळाडूंनी उपांत्यपूर्व आणि उपांत्य फेरी गाठून जागतिक क्रमवारीत प्रगती केली आहे. आगामी सुपर सिरीज स्पर्धांसाठी भारतीय संघ आत्मविश्वासात दिसत आहे.

### ऑलिम्पिक तयारीसाठी केंद्र सरकारचा विशेष आराखडा

२०२८ ऑलिम्पिकच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने क्रीडा प्राधिकरण, प्रशिक्षक आणि राज्य संघटनांसोबत विशेष आढावा बैठक घेतली. खेळाडूंना आधुनिक प्रशिक्षण, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा आणि परदेशी प्रशिक्षक उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे. ग्रामीण भागातून प्रतिभावान खेळाडू शोधण्यासाठीही नवीन मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### महिला क्रीडापटूंच्या सुरक्षेवर भर

मुंबई – देशातील महिला खेळाडूंसाठी स्वतंत्र तक्रार निवारण यंत्रणा अधिक मजबूत करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. प्रशिक्षण शिबिरे आणि क्रीडा संस्थांमध्ये सुरक्षित वातावरण निर्माण करण्यासाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यात येत आहेत. महिला क्रीडापटूंवरील अन्याय आणि छळाच्या घटनांमुळे हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

### देशातील क्रीडा पायाभूत सुविधांवर मोठी गुंतवणूक


मुंबई – केंद्र आणि विविध राज्य सरकारांनी नवीन स्टेडियम, सिंथेटिक ट्रॅक, जलतरण तलाव आणि ग्रामीण क्रीडा संकुल उभारणीसाठी निधी मंजूर करण्यास सुरुवात केली आहे. खेळो इंडिया अभियानांतर्गत लहान शहरांतील खेळाडूंना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न सुरू आहे.

### भारतीय क्रीडाक्षेत्र नव्या परिवर्तनाच्या उंबरठ्यावर...

भारतीय क्रीडाक्षेत्रात आता केवळ क्रिकेटपुरते मर्यादित चित्र राहिलेले नाही. विविध खेळांमध्ये देशातील खेळाडू जागतिक स्तरावर चमकू लागले आहेत. मात्र प्रशासनातील पारदर्शकता, खेळाडूंची सुरक्षा आणि दीर्घकालीन नियोजन यावर भर दिला तरच भारत खऱ्या अर्थाने जागतिक क्रीडा महासत्ता बनू शकतो.

# महाज्योती आता यशाचा ब्रँड –मंत्री अतुल सावे

## 'महाज्योती'च्या प्रशिक्षणातून १०० अधिकारी घडण्याचा नवा विक्रम



**मुंबई । प्रतिनिधी**

**यूपीएससी वन सेवा परीक्षेत 'महाज्योती'च्या आठ विद्यार्थ्यांनी मिळवलेले यश आणि संस्थेने ओलांडलेला यशाचा ऐतिहासिक 'शतकीय' टप्पा, ही महाराष्ट्रासाठी अत्यंत अभिमानाची बाब असून 'महाज्योती' आता केवळ एक प्रशिक्षण संस्था उरली नसून, ती ग्रामीण भागातील गुणवंतांना प्रशासनात हक्काचे स्थान मिळवून देणारा एक सक्षम 'ब्रँड' बनली आहे, असे मत इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे मंत्री तसेच 'महाज्योती'चे अध्यक्ष अतुल सावे यांनी व्यक्त केले आहे.**

यूपीएससीमध्ये १०० यशस्वी विद्यार्थ्यांचा आकडा पूर्ण होणे ही एका नव्या युगाची सुरुवात आहे. यशस्वी विद्यार्थी हे 'महाज्योती'च्या चळवळीचे खरे आधारस्तंभ असून, भविष्यात हा आकडा हजारोमध्ये जावा यासाठी शासन पूर्ण ताकदीनिशी महाज्योतीच्या पाठीशी उभे राहील, असा विश्वास मंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केला आहे. ग्रामीण आणि सर्वसामान्य कष्टकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना आयएएस आणि आयएफएस अशा सर्वोच्च पदांपर्यंत पोहोचवण्यासाठी महाज्योती केंद्रबिंदू ठरत आहे. वन सेवेच्या अंतिम निवड यादीत मोहिनी अशोक जगताप, रोहित तुकाराम मालावेकर, रोहित संजय पवार, सोहम नामदेव शेंडे, अक्षय हरिभाऊ पवार, प्रतिक चंद्रशेखर कुशारे, दर्शन राजेंद्र सूर्यवंशी आणि अभिषेक योगीराज कट्टे या आठ गुणवंतांनी स्थान मिळवले आहे. हे सर्व विद्यार्थी आता भारतीय वन सेवेमध्ये (आयएफएस) अधिकारी म्हणून रुजू होणार आहेत, अशी माहिती 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांचे कठोर परिश्रम आणि

पान २ वर

# जनगणना–२०२७ घर सूचीकरणासाठी नागरिकांनी सहकार्य करावे–जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

**जनगणना –२०२७ अंतर्गत घर सूचीकरण प्रक्रिया डिजिटल पद्धतीने राबविण्यात येणार असून, नागरिकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून प्रशासनाला सहकार्य करावे,असे आवाहन जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी श्री विवेक जॉन्सन यांनी केले आहे. जनगणना प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या प्रगणकांकडून नागरिकांच्या घर सूचीकरणाची आवश्यक ती नोंद पूर्ण केली जाणार आहे.तसेच काही कारणास्तव नागरिकांना दिनांक १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वतः स्व–गणना करणे शक्य झाले नसल्यास,अशा नागरिकांसाठी दिनांक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत नियुक्त प्रगणक घरभेटी देऊन माहिती संकलित करणार आहेत.**



यावेळी नागरिकांनी शासनाने निर्धारित केलेल्या जनगणनेशी संबंधित ३३ प्रश्नांची माहिती प्रगणकांना उपलब्ध करून द्यावी लागणार आहे.या माहितीद्वारे संबंधित नागरिकांची नोंद जनगणनेच्या पोर्टलवर करण्यात येणार आहे. घर सूचीकरण प्रक्रियेत इमारत व घर क्रमांक,घराचे स्थान,कुटुंबातील सदस्यांची संख्या,कुटुंब प्रमुखाचे नाव,लिंग व प्रवर्ग,राहण्याच्या खोल्यांची संख्या,विवाहित जोडप्यांची संख्या,उपलब्ध सुविधा–सुविधा,मालमत्ता,साहित्य आदी विविध बाबींची माहिती विचारली जाणार आहे.या सर्व माहितीच्या आधारे घर सूचीकरणाचे काम डिजिटल स्वरूपात पूर्ण करण्यात येईल.जनगणना –२०२७ संदर्भातील नागरिकांची माहिती पूर्णपणे गोपनीय व सुरक्षित ठेवली जाणार आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी जनगणना –२०२७ च्या टप्पा क्रमांक १ मध्ये सक्रिय सहभाग नोंदवून दिनांक १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत होणाऱ्या घर सूचीकरण प्रक्रियेसाठी नियुक्त प्रगणक व पर्यवेक्षकांना आवश्यक माहिती द्यावी आणि राष्ट्रीय कर्तव्य पार पाडावे. बीड जिल्हा घर सूचीकरणाच्या कामकाजात राज्यात अग्रस्थानी राहावा,यासाठी सर्वांनी विशेष प्रयत्न करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

## खरीप हंगामासाठी आवश्यक सज्जता ठेवावी–पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले



**लातूर । प्रतिनिधी**

**भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार २०२६ च्या मान्सूनवर 'एल–निनो'चा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर आगामी खरीप हंगामात उद्भवणाऱ्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक सज्जता ठेवावी. तसेच शेतकऱ्यांना पेरणी, बियाणे व खत वापर याविषयी योग्य मार्गदर्शन करावे, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या.**

खरीप हंगाम पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. विधान परिषद आमदार तथा मुख्य प्रतोद विक्रम काळे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम यांच्यासह पशुसंवर्धन विभाग, अग्रणी बँक, आत्मा, वन आदी विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.



## इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यांना मिळणार शाळेच्या पहिल्या दिवशी मोफत पाठ्यपुस्तके– दयानंद सुरवसे

**लातूर । प्रतिनिधी**

**समग्र शिक्षा,जिल्हा परिषद,लातूर अंतर्गत इयत्ता पहिली ते आठवीच्या स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक वितरित करणाऱ्या वाहनाच्या वाहनाला हिरवा झेंडा दाखवून वाहतुकीचा शुभारंभ जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा सभापती,शिक्षण समिती,जिल्हा परिषद,लातूर मा. श्री दयानंद सुरवसे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी शिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती तृप्ती अंधारे या उपस्थित होत्या.**

सदरील कार्यक्रमास बालभारती, विभागीय मंडळाचे श्री.सचिन आलडवाड,भांडार व्यवस्थापक लातूर,श्रीकिशोर जाधव,सहाय्यक निर्मिती अधिकारी,श्री दिपक कुंभार,भांडार अधीक्षक तसेच श्री दिपक गलांडे, रवी औसेकर, चेतन वाल्मिकी,श्री चौळे उपस्थित होते. तसेच पाठ्यपुस्तक वाटपाचे नियोजन समग्र शिक्षा अभियान या कार्यालयामार्फत करण्यात येत असून त्या कार्यालयाचे श्री. सतीश भापकर,रउफ शेख,श्री.चंद्रकांत ठाकरे श्री.दत्तात्रय माळकर, श्री.सुनील राजुरे,श्री.गोविंद भोळे,श्री.योगिराज आमगे इत्यादी अधिकारी कर्मचारी सदर उपक्रमाचे नियोजन करत आहेत.

# भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम येत्या वर्षभरात पूर्ण करणार–मंत्री अतुल सावे

**पुणे । प्रतिनिधी**

**महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त राज्य शासनाकडून विविध उपक्रमाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे, याच पार्श्वभूमीवर भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम येत्या वर्षभरात पूर्ण करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले.**



श्री. सावे यांनी आज भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाच्या कामाची पाहणी केली, यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर, अधीक्षक अभियंता बिपिन शिंदे, महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे, पीएमपीएल संचालक तथा नगरसेवक अजय खेडेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते. श्री. सावे म्हणाले, क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती नागरिकांना व्हावी, याकरिता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत चर्चा करुन भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करुन कामाची सुरुवात करण्यात आली होती. सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेच्या माध्यमातून स्मारकाचे काम वेगाने सुरू असून सध्याची ९० टक्के काम पूर्ण झाले आहे, या कामाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत उर्वरित विकास कामे गतीने पूर्ण करण्याच्या सूचना यावेळी श्री. सावे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी श्री. नायर यांनी पुणे महानगरपालिकेच्यावतीने भिडेवाडा राष्ट्रीय स्मारक विकास आराखड्याच्या अनुषंगाने करण्यात येणाऱ्या कामांबाबत माहिती दिली.

# नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या आधुनिकीकरणाला केंद्र सरकारची मंजुरी

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या अद्ययावतीकरण आणि आधुनिकीकरणाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील केंद्रीय मंत्रिमंडळाने सार्वजनिक–खाजगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर राबवण्यास मंजुरी दिली आहे. या महत्वाच्या निर्णयानुसार, भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या मिहान इंडिया लिमिटेडला दिलेल्या जमिनीची भाडेपट्ट्याची मुदत ६ ऑगस्ट २०३९ नंतरही वाढवण्यात आली आहे. या मुदतवाढीमुळे आता सवलतदार असलेल्या जीएमआर नागपूर इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडला (जीएनआयएएल) व्यावसायिक कामकाज सुरू झाल्यापासून पुढील ३० वर्षांच्या कालावधीसाठी विमानतळाचे संचालन आणि विकास करणे शक्य होणार आहे.

'मल्टी–मोडल इंटरनॅशनल कार्गो हब अँड एअरपोर्ट ट नागपूर' (मिहान) प्रकल्पांतर्गत या विमानतळाला प्रादेशिक विमान वाहतूक केंद्र बनवण्याच्या दिशेने हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. यापूर्वी २००९ मध्ये विमानतळ मालमत्ता हस्तांतरित करण्यात आली होती, मात्र जमिनीच्या सीमांकनामुळे भाडेपट्टा करारास विलंब झाला होता. २०१६ मध्ये काढलेल्या जागतिक निविदेत जीएमआर एअरपोर्ट्स लिमिटेडने सर्वोच्च बोली लावली होती, जी नंतर १४.४९ टक्के महसूल हिश्श्यासह सुधारित करण्यात आली. २०२० मध्ये निविदा रद्द करण्यावरून उद्भवलेला न्यायालयीन वाद



सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर संपुष्टात आला असून, ८ ऑक्टोबर २०२४ रोजी जीएनआयएएलसोबत नवीन सवलत करारावर स्वाक्षरी करण्यात आली आहे.या प्रकल्पामुळे नागपूर विमानतळाच्या विकासाच्या एका नवीन पर्वाला सुरुवात होणार आहे. जीएनआयएएलद्वारे या विमानतळाचे जागतिक दर्जाच्या सुविधेत रूपांतर करण्यात येईल, ज्याची अंतिम क्षमता वार्षिक ३ कोटी प्रवाशांना हाताळण्याची असेल. या परिवर्तनामुळे केवळ विदर्भ प्रांतातील संपर्क व्यवस्था (कनेक्टिव्हिटी) सुधारणार नाही, तर मालवाहतूक क्षमतेत मोठी वाढ होऊन आर्थिक पायाभूत सुविधाही अधिक मजबूत होतील. खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक आणि सरकारी देखरेख यांच्या संगमातून प्रवाशांना दर्जेदार सेवा आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधा मिळतील, ज्यामुळे नागपूर हे मध्य भारतातील विमान वाहतुकीचे प्रमुख केंद्र म्हणून नावारूपास येईल.

# देश हादरला..!

## मागील आठवड्यात गाजलेल्या प्रमुख क्राईम घटना....

**देशभरात गेल्या आठवड्यात घडलेल्या काही गुन्हेगारी घटनांनी कायदा–सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले. पेपरफुटी रॅकेटपासून सायबर फसवणूक, धार्मिक अंधश्रद्धेच्या नावाखाली खून, तर संघटित गुन्हेगारीपर्यंत अनेक धक्कादायक प्रकरणांनी देश हादरला आहे.**

**नीट पेपरफुटीचे देशव्यापी रॅकेट उघड!**

दिल्ली – देशातील सर्वात मोठ्या वैद्यकीय प्रवेश परीक्षेतील नीट–यूजी २०२६ पेपरफुटी प्रकरणाने शिक्षण व्यवस्थेलाच हादरा दिला. महाराष्ट्र, बिहार, राजस्थान, हरियाणा, उत्तराखंड आणि केरळपर्यंत पसरलेल्या या रॅकेटमध्ये तब्बल ४५ जणांचा सहभाग असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. वैद्यकीय विद्यार्थी, कोचिंग सेंटर चालक, पेपर सॉल्व्हर आणि मध्यस्थ यांचा मोठा साखळी व्यवहार उघड झाला. सीबीआयने पुणे, नाशिक, जयपूर आणि गुरुग्रामसह अनेक शहरांमध्ये धाडसत्र राबवून आरोपींना अटक केली. काही आरोपींनी लाखो रुपयांत प्रश्नपत्रिका विकल्याचा आरोप आहे.

**पुण्यातील शिक्षिकाच पेपरफुटीची मास्टरमाईंड? त्याचे कनेक्शन थेट बीड पर्यंत**

पुण्यातील वरिष्ठ बॉटनी शिक्षिका मनीषा मंधारे आणि मूळ बीडचे प्राध्यापक कुलकर्णी यांना सीबीआयने अटक केल्यानंतर प्रकरणाला आणखी गंभीर वळण लागले. त्या नीटच्या तज्ज्ञ समितीशी संबंधित असल्याने संशय अधिक गडद झाला आहे. तपास यंत्रणेनुसार, परीक्षेपूर्वी खासगी सत्र घेऊन निवडक विद्यार्थ्यांना प्रश्नांचा अंदाज देण्यात आला होता. त्यातील अनेक प्रश्न मूळ परीक्षेत आढळल्याने संपूर्ण प्रणालीच संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

**सायबर गुन्हेगारीचे चीन कनेक्शन..!**

दिल्ली – देशभरातील २३४ सायबर फसवणूक प्रकरणांचा तपास करताना अंमलबजावणी संचालनालयाला (एऊ) मोठे आर्थिक जाळे उघडकीस आले आहे. ऑनलाइन बेटिंग, क्रिप्टो स्कॅम, फेक लोन ॲप्स आणि डिजिटल अटक फसवणूक यामध्ये हजारो कोटींचा व्यवहार झाल्याचा संशय आहे. काही व्यवहारांचे धागेदोरे चीनशी संबंधित असल्याची माहिती समोर आली आहे. आतापर्यंत हजारो कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे.

**अंधश्रद्धेच्या नावाखाली तिहेरी हत्या!**

दिल्ली – दिल्लीतील पीरागढी परिसरात घडलेल्या तिहेरी मृत्यू प्रकरणाने संपूर्ण देशाला हादरवले. सुरुवातीला आत्महत्या वाटणाऱ्या या घटनेचा तपास करताना पोलिसांनी एका स्वयंघोषित तांत्रिक बाबाला अटक केली. पैशांची रक्कम तिप्पट करून देण्याचे आमिष दाखवत आरोपीने पीडितांना विषारी लाडू खाऊ घातल्याचा आरोप आहे. सीसीटीव्ही आणि कॉल रेकॉर्डच्या आधारे पोलिसांनी गुन्ह्याचा उलगडा केला.

**रांची पोलिसांचे मध्यरात्री ऑपरेशन..!**

रांची – झारखंडची राजधानी रांची येथे पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत मध्यरात्री मोठी कारवाई केली. शहरभर छापेमारी करत १०० हून अधिक आरोपींना अटक करण्यात आली. फरार गुन्हेगार, वॉरंटधारक आणि संघटित टोळ्यांवर ही कारवाई करण्यात आली. रात्रीभर सुरू असलेल्या या मोहिमेमुळे गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

**आयआयटी बॉम्बे हॉस्टेलमध्ये जिवंत काडतुसे!..**

मुंबई – भारतीय तंत्रज्ञान संस्था, मुंबई च्या हॉस्टेलमध्ये विद्यार्थ्याच्या बॅगेतून पाच जिवंत काडतुसे सापडल्याने खळबळ उडाली. प्राथमिक चौकशीत ही काडतुसे बिहारमधून आणल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. पोलिसांनी ऋखठ दाखल करून तपास सुरू केला आहे. देशातील प्रतिष्ठित शैक्षणिक संस्थांमध्येही सुरक्षेचे प्रश्न निर्माण झाल्याची चर्चा सुरू झाली आहे.

**पुण्यात हॉस्पिटलमध्ये बॉम्बसदृश वस्तू ठेवून खंडणीचा कट!**

पुणे – हडपसर परिसरातील उषाकिरण सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये बॉम्बसदृश वस्तू आढळल्याने मोठी खळबळ उडाली. रुग्ण आणि कर्मचाऱ्यांची तातडीने सुटका करण्यात आली. तपासानंतर ही वस्तू 'डमी बॉम्ब' असल्याचे स्पष्ट झाले. आर्थिक अडचणीत सापडलेल्या शिवाजी राठोड या व्यक्तीने हॉस्पिटलकडून खंडणी उकळण्यासाठी हा कट रचल्याचे एटीएस तपासात समोर आले. आरोपीला नागपूर रेल्वे स्थानकावरून अटक करण्यात आली. या घटनेमुळे पुण्यातील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**मुंब्रा ब्ल्यू ड्रम मर्डरने मुंबई हादरली!**

ठाणे – जिल्ह्यातील मुंब्रा परिसरात एका २४ वर्षीय युवकाचा मृतदेह निळ्या ड्रममध्ये सापडल्याने खळबळ उडाली. पोलिस तपासात धक्कादायक सत्य समोर आले. विवाहित नर्स असलेल्या महिलेने आपल्या पतीच्या मदतीने प्रियकराचा खून केल्याचे उघड झाले. आर्थिक व्यवहार आणि वैयक्तिक वादातून ही हत्या घडल्याचा संशय आहे. आरोपींनी मृतदेह लपवण्यासाठी ड्रमचा वापर केला होता. महिनाभरानंतर पोलिसांनी सीसीटीव्ही आणि मोबाईल लोकेशनच्या आधारे गुन्ह्याचा उलगडा केला.

**चार वर्षांच्या चिमुरडीवर अत्याचारानंतर हत्या!**

पुणे – जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे चार वर्षांच्या मुलीवर अत्याचार करून तिची हत्या करण्यात आल्याची संतापजनक घटना घडली. ६५ वर्षीय आरोपीने मुलीला खाऊचे आमिष दाखवून गोठ्यात नेले आणि अमानुष कृत्य केले. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी आरोपीला अटक केली. या घटनेनंतर पुण्यात तीव्र आंदोलन झाले. नवले पुलावर नागरिकांनी रास्ता रोको करत आरोपीला फाशी देण्याची मागणी केली. या प्रकरणामुळे महिलांच्या आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

**नागपुरात बँक रिकव्हरी एजंटची निर्घृण हत्या!**

नागपूर – गिट्टीखदान परिसरात बँकेसाठी कर्जवसुलीचे काम करणाऱ्या ४२ वर्षीय अजय श्रीबस यांची चाकूने भोसकून हत्या करण्यात आली. घरात एकटे राहत असलेल्या श्रीबस यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळला. प्राथमिक तपासात आर्थिक व्यवहार, वैयक्तिक वाद किंवा व्यावसायिक शत्रुत्वाचा कोन तपासला जात आहे. परिसरातील सीसीटीव्ही बंद असल्याने पोलिसांसमोर तपासाचे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.

**सायबर गुन्ह्यांचा महाराष्ट्रात स्फोट!**

नागपुर – येथे आयोजित सायबर जागृती कार्यक्रमात एका वृद्ध दाम्पत्याने 'डिजिटल अटक' फसवणुकीत तब्बल ८९ लाख रुपये गमावल्याची धक्कादायक माहिती समोर आली. सायबर गुन्हेगारांनी पोलिस आणि केंद्रीय यंत्रणांचे नाव वापरत भीती निर्माण करून पैसे उकळल्याचे सांगण्यात आले. पोलिसांनी तत्परतेने कारवाई करून २० लाख रुपये परत मिळवले असले तरी राज्यात वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

**पुलगाव फायरिंग रेंजवर मेजरकडून जवान ठार?**

वर्धा – जिल्ह्यातील पुलगाव येथील केंद्रीय दारुगोळा डेपोमध्ये सरावादरम्यान मेजरने कनिष्ठ अधिकाऱ्यावर गोळीबार केल्याची घटना समोर आली. सुभेदार मेजर ओम बहादूर खंड यांचा जागीच मृत्यू झाला. सैन्याने हा अपघाती गोळीबार असल्याचा दावा केला असला तरी पोलिसांना संशयास्पद बाबी आढळल्या आहेत. आरोपी मेजरच्या मानसिक स्थितीबाबतही चर्चा सुरू असून या प्रकरणामुळे सैन्य आणि स्थानिक पोलिसांमध्ये अधिकारक्षेत्रावरून तणाव निर्माण झाला आहे.

**गडचिरोलीत नक्षलवादाचा शेवट; १०० तासांच्या ऑपरेशनमध्ये मोठी कारवाई**

गडचिरोली – येथे सुरक्षा दलांनी सलग १०० तास मोहीम राबवत उर्वरित सक्रिय नक्षलवाद्यांचा खात्मा केल्याचा दावा करण्यात आला. कंपनी क्रमांक १० मधील चार नक्षलवादी मारले गेले, तर दोघांनी आत्मसमर्पण केले. अनेक वर्षांपासून दहशतीखाली असलेल्या भागात या कारवाईनंतर मोठा दिलासा व्यक्त केला जात आहे. राज्य सरकारने महाराष्ट्र 'नक्षलमुक्त' झाल्याचा दावा केला असला तरी सुरक्षा यंत्रणा अजूनही सतर्क आहेत.

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी अंकिता ऑफसेट प्रिंटींग, प्लॉट नं.डी–३ एम.आय.डी.सी.बीड–४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : क्रांती नगर, तळेकर निवास जवळ, डॉ.बारकुल हॉस्पिटलजवळ, बीड येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत)

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ANKITA OFFSET PRINTING, POLOT NO.D-3, MIDC BEED-431122 AND PUBLISHED AT. THE OFFICE OF W E E K LY SHIVVANI, BEED OFFICE : KRANTI NAGAR, NEAR TALEKAR NIWAS, NEAR DR.BARKUL HOSPITAL, BEED. (JURISDICTION AT BEED)